सोलापूर तरुण भारत
Solapur Tarun Bharat
न मे कर्मफले स्पृहा
छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर | सोमवार, दि. २० एप्रिल २०२६ | वर्ष – ४ थे | अंक ७ | पाने : ८ | किंमत रु. ६/– | dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# तामिळनाडूत फटाका कारखान्यात भीषण स्फोट

## १६ कामगारांचा मृत्यू, मृतांचा आकडा वाढण्याची भीती

**विरुधुनगर :** तामिळनाडूतील विरुधुनगर जिल्ह्यात एका फटाका निर्मिती कारखान्यात झालेल्या भीषण स्फोटामुळे मोठी दुर्घटना घडली आहे. प्राथमिक माहितीनुसार, या दुर्घटनेत आतापर्यंत १६ जणांचे मृतदेह ढिगाऱ्याखालून बाहेर काढण्यात आले असून, अनेक कामगार अद्यापही मलब्याखाली गाडले गेल्याची भीती व्यक्त होत आहे. या घटनेत अनेक जण गंभीर जखमी झाले असून, त्यांना तातडीने उपचारासाठी जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.हा भीषण स्फोट कट्टनारपट्टी भागातील एका फटाका युनिटमध्ये झाला. स्फोटाची तीव्रता इतकी प्रचंड होती की, आगीने काही वेळातच कचाट्यात घेतले. या घटनेमुळे असून स्थानिक नागरिकांमध्ये धक्क्याने परिसरातील इमारतींचेही झाले आहे. घटनेची माहिति आणि आपत्ती निवारण पथके युद्धपातळीवर बचावकार्य सुरू परिसराला पोलिसांनी वेढा घा-कडेकोट बंदोबस्त तैनात करण्यात कारण अद्याप स्पष्ट झाले नसले मानकांकडे दुर्लक्ष केल्यामुळे ही प्राथमिक अंदाज वर्तवण्यात येत सखोल चौकशीचे आदेश दिले परिस्थितीवर बारकाईने लक्ष सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी तामिळनाडूचे मुख्यमंत्री एम.



शेजारील चार युनिट्सना आपल्या परिसरात एकच खळबळ उडाली भीतीचे वातावरण आहे. स्फोटाच्या मोठ्या प्रमाणावर नुकसान मिळताच अग्निशमन दल, पोलीस घटनास्थळी दाखल झाली असून, करण्यात आले आहे. सध्या संपूर्ण तला असून सुरक्षेच्या कारणास्तव आला आहे.स्फोटाचे नेमके तरी, फटाके तयार करताना सुरक्षा दुर्घटना घडली असावी, असा आहे. प्रशासनाने या प्रकरणाच्या आहेत. स्थानिक प्रशासन ठेवून असून बचावकार्य वेगाने सांगितले.या हृदयद्रावक घटनेवर के. स्टालिन यांनी तीव्र दुःख व्यक्त केले आहे. ते म्हणाले की, विरुधुनगर जिल्ह्यातील कट्टनापट्टी येथील फटाका कारखान्यात झालेल्या स्फोटात अनेकांचा मृत्यू झाल्याची बातमी अत्यंत वेदनादायी आहे. ज्या कुटुंबांनी आपले प्रियजन गमावले आहेत, त्यांच्याप्रती मी संवेदना व्यक्त करतो.मुख्यमंत्री पुढे म्हणाले की, त्यांनी मंत्री के. के. एस. एस. आर. रामचंद्रन आणि थंगम थेन्नारासू यांना तातडीने घटनास्थळी पोहोचून बचावकार्यावर देखरेख करण्याचे तसेच बाधित कुटुंबांना धीर देण्याचे निर्देश दिले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांशी चर्चा करून पीडितांना सर्वतोपरी मदत सुनिश्चित करण्यात येईल असेही ते म्हणाले.

## यामाहाची नवीन बाईक लॉन्च

**मुंबई :** दुचाकी वाहन निर्माता कंपनी यामाहा मोटरसायकल आणि स्कूटर इंडियाने आपल्या लोकप्रिय स्कूटर यामाहा फॅसिनो १२५ ला २०२६ साठी अपडेट करत बाजारात सादर केले आहे. या नव्या मॉडेलची सुरुवातीची एक्स-शोरूम किंमत ७५,६०० रुपये ठेवण्यात आली असून, विविध व्हेरिएंटनुसार किंमत ९५,२०० रुपयांपर्यंत जाते. यापूर्वी ऑगस्ट २०२५ मध्ये या स्कूटरमध्ये बदल करण्यात आले होते, मात्र यावेळचा अपडेट मुख्यतः कॉस्मेटिक स्वरूपाचा आहे.नवीन २०२६ फॅसिनो १२५ स्कूटर कंपनीने ड्रम, डिस्क आणि एस अशा तीन व्हेरिएंट्समध्ये उपलब्ध करून दिला आहे.

## कुंभमेळ्याची तयारी

**नाशिक :** भोंदूबाबा अशोक खरात आणि टीसीएस कंपनी नंतर नाशिक आणखी एक कारणाने चर्चेत आहे ते म्हणजे सिंहस्थ कुंभमेळा या कुंभमेळ्यासाठी गोदावरीच्या काठावर १२ नवीन घाट, ४०० एकर जागा आरक्षित करणे आणि पायाभूत सुविधांचा विकास करण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे आजपासून पुढील तीन महिने शहरातील द्वारका सर्कल बंद राहणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## कामगार रुग्णालय पूर्ण क्षमतेने सुरु करा

मुंबई : अंधेरी (पूर्व) येथील ईएसआयसी (एडखउ) कामगार रुग्णालय गेल्या अनेक वर्षांपासून विविध समस्यांच्या गर्तेत अडकले आहे. या रुग्णालयाचे गेल्या अनेक वर्षापासून कोट्यावधी रुपये खर्च करूनही अद्याप अपूर्ण अवस्थेत असलेल्या नूतनीकरणाचे काम तातडीने पूर्ण करून ते पूर्ण क्षमतेने सुरू करावे, अशी आग्रही मागणी मुंबई उत्तर-पश्र्चिम लोकसभा क्षेत्राचे खासदार रवींद्र वायकर यांनी केंद्रीय श्रम आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवियांची भेट घेऊन पत्राद्वारे केली आहे. केंद्रीय मंत्री यांनी देखील याची गंभीर दाखल घेऊन या संपूर्ण कामाची सखोल चौकशी करून दोषींवर कारवाई करण्याचे तसेच रुग्णालयाचे अपूर्ण असलेले काम लवकरच पूर्ण करून ते पूर्ण क्षमतेने सुरु करण्याचे आश्र्वासन दिले.

## सिलेंडरच्या स्फोटात एकाचा मृत्यू

**नागपूर :** नागपूर जिल्ह्यातील कामठी परिसरातील गांधीनगर भाजी मंडी येथे रविवारी सकाळी घडलेल्या भीषण सिलेंडर स्फोटामुळे एकाचा मृत्यू तर १० जण जखमी झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या दुर्घटनेत अतुल उर्फ बंटी दशरथ पानतावणे (वय ४०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून त्यांच्या कुटुंबावर शोककळा पसरली आहे.

## व्यापाऱ्याला बेदम मारहाण

**सोलापूर :** सोलापूरच्या बाळीवेस परिसरात आंबे कमी दरात विकत असल्याच्या कारणावरून वसीम बागवान (४०) यांना चौघांनी मिळून बेदम मारहाण केली. ही घटना शनिवारी सायंकाळी मारुती मंदिराजवळ घडली. जखमी बागवान यांच्यावर श्री छत्रपती शिवाजी महाराज सर्वोपचार रुग्णालय येथे उपचार सुरू असून प्रकृती स्थिर आहे. या प्रकरणाची नोंद पोलिसांकडे करण्यात आली आहे.

## तरुणाचा मृतदेह आढळला

**पुणे :** भिडे पूल परिसरातील मुठा नदीपात्रात एका अज्ञात तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने खळबळ उडाली. शरीरावर गंभीर जखमा आढळल्याने दगडाने ठेचून व धारदार शस्त्राने वार करून हत्या केल्याचा प्राथमिक अंदाज आहे. पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेज तपासणी सुरू केली असून मृताची ओळख पटवण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

# द्रमुक आणि काँग्रेसने महिला आरक्षण विधेयक मंजूर होऊ दिले नाही : अमित शाह

**वृत्तसंस्था**

**चेन्नई :** केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी द्रमुक आणि काँग्रेसवर महिला आरक्षण विधेयकाबाबत गंभीर आरोप केले आहेत. त्यांनी म्हटले की, या दोन्ही पक्षांनी संसदेत महिलांना सक्षम करणारे महिला आरक्षण विधेयक मंजूर होऊ दिले नाही.तामिळनाडू विधानसभा निवडणुकीच्या पार्श्र्वभूमीवर इरोड जिल्ह्यातील मोडक्कुरिची मतदारसंघात भाजप उमेदवार कृतिका यांच्या प्रचारसभेत बोलताना अमित शाह यांनी विरोधकांवर टीका केली. यावेळी कार्यकर्त्यांनी मोठ्या उत्साहात ढोल-ताशांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. त्यांचा रोडशो शिवगिरी शासकीय रुग्णालय



परिसरातून सुरू होऊन थिरुन चिन्नमलाई यांच्या पुतळ्याजवळ संपला.अमित शाह यांनी आपल्या भाषणात एम. के. स्टॅलिन यांच्या नेतृत्वाखालील द्रमुक सरकारवरही निशाणा साधला. त्यांनी आरोप केला की, एम. करुणानिधी यांच्यापासून सुरू झालेली घराणेशाही आजही सुरू असून स्टॅलिन आपल्या मुलाला मुख्यमंत्री बनवण्याचा प्रयत्न करत आहेत.तसेच, एडप्पाडी के. पलानीस्वामी यांच्या नेतृत्वाखाली तामिळनाडूमध्ये मजबूत आघाडी उभी राहत असल्याचा दावा शाह यांनी केला. राज्यात राष्ट्रीय लोकशाही आघाडीचे सरकार आल्यास भ्रष्टाचार संपुष्टात येईल आणि तामिळनाडूची प्रतिष्ठा पुन्हा प्रस्थापित होईल, असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

# जहाजांना सुरक्षाकवच !

## 'भारत मेरीटाइम इन्शुरन्स पूल' स्थापनेचा केंद्रीय मंत्रिमंडळाचा निर्णयनवी

**वृत्तसंस्था**

**दिल्ली :** पश्चिम आशियातील तणाव व जागतिक अनिश्र्चिततेच्या पार्श्र्वभूमीवर, केंद्राने भारतीय जहाजे व सागरी व्यापाराच्या संरक्षणासाठी १२,९८० कोटी रुपयांच्या सरकारी हमीसह 'भारत मेरिटाइम इन्शुरन्स पूल (बीएमआय)' या देशांतर्गत विमा निधीस मंजुरी दिली. भारतीय तसेच भारताशी संबंधित जहाजांना आंतरराष्ट्रीय जलमार्गांवर विमा संरक्षण देणे हा या योजनेचा हेतू आहे. मंत्रिमंडळ बैठकीनंतर माहिती व प्रसारण मंत्री अश्र्विनी वैष्णव यांनी या निर्णयाविषयी पत्रकारांना माहिती दिली. 'भारत मेरीटाइम इन्शुरन्स पूल हा भारताचा ध्वज असलेल्या तसेच भारताच्या नियंत्रणाखालील जहाजांना लागू असेल. हा निधी १० वर्षांसाठी असेल. यामुळे परदेशी विमा कंपन्यांवरील आपले अवलंबित्व कमी होईल आणि परकीय चलनाची बचत होईल,' असे मंत्री वैष्णव म्हणाले.जागतिक पातळीवर अस्थिरता आणि भूराजकीय तणाव वाढल्याने सागरी व्यापारावर परिणाम झाला असून, माल व जहाजांच्या नुकसानीचा धोका वाढल्याने विमा खर्च वाढला आहे. याखेरीज तेलगळती, जहाजांचे अवशेष हटवणे, मालाचे नुकसान, कर्मचाऱ्यांच्या जखमा व पुनर्वसन, धडकविषयक जबाबदाऱ्या इत्यादी जोखमींसाठी भारतीय जहाजे परदेशी विम्यावर अवलंबून आहेत. या पार्श्र्वभूमीवर, निर्बंध किंवा भूराजकीय तणावामुळे विमा संरक्षण काढून घेतल्यास व्यापाराचे सातत्य आणि सार्वभौमत्व राखण्यासाठी देशांतर्गत सागरी जोखीम विमा निधी आवशयक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

# इस्त्रायल मोठ्या संकटात

## १६ मुस्लिम देशांची एकजूट



**वृत्तसंस्था**

**तेहरान :** इराण आणि अमेरिकेमधील वाढत्या तणावाच्या पार्श्र्वभूमीवर इस्त्रायलला मोठा राजनैतिक धक्का बसल्याचे चित्र समोर आले आहे. अनेक देशांनी इस्त्रायलच्या भूमिकेविरोधात उघडपणे भूमिका घेतली असून तब्बल १६ देश एकत्र येत कडवा विरोध नोंदवला आहे. शनिवार १८ एप्रिल २०२६ रोजी दोहा येथे इस्लामिक देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांनी संयुक्त निवेदन जारी करत इस्त्रायलच्या निर्णयांवर तीव्र नाराजी व्यक्त केली. इस्त्रायलच्या विरोधात १६ अरब देशांनी एक संयुक्त निवेदन काढून इस्त्रायलने सोमालीलँडला सार्वभौम राष्ट्र म्हणून दिलेल्या मान्यतेचा निषेध केला आहे. ही राजनैतिक कारवाई एप्रिल २०२६ मध्ये झाली असून, या देशांनी इस्त्रायलच्या या कृतीला सोमालियाच्या सार्वभौमत्वाचे उल्लंघन म्हटले आहे. अल्जेरिया , कोमोरोस , जिबूती , इजिप्त , जॉर्डन , कुवेत , लेबनॉन , लिबिया , मॉरिटानिया , ओमान , पॅलेस्टाईन , कतार , सौदी अरेबिया , सोमालिया , सुदान आणि येमेन.

सोमालियामध्ये इस्त्रायलच्या राजदूत नियुक्तीला अवैध ठरवत, ही एकतर्फी कारवाई असल्याचे मुस्लिम देशांनी म्हटले. आंतरराष्ट्रीय समुदायाने सोमालियाच्या सार्वभौमत्वाचा आदर करावा, असे आवाहन करण्यात आले. दरम्यान, इराण-अमेरिका संघर्षामुळे जागतिक तणाव वाढला असून या पार्श्र्वभूमीवर इस्त्रायलची पुढील भूमिका महत्त्वाची ठरणार आहे.

# रेल्वे करणार भुयारी मार्गाचे जाळे

**तभा वृत्तसेवा**

**मुंबई :** मुंबई उपनगरीय रेल्वे ही मुंबई महानगर क्षेत्राची जीवनवाहिनी आहे. वाजवी दरात वेगाने प्रवास करण्याचा पर्याय म्हणून लाखो मुंबईकर रेल्वेची निवड करतात. दररोज पश्र्चिम रेल्वेद्वारे सुमारे ३० लाख तर मध्य रेल्वेद्वारे सुमारे ६२ लाख प्रवासी प्रवास करतात. पश्र्चिम रेल्वे चर्चगेट ते डहाणू आणि मध्य रेल्वे ही छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कसारा, कर्जत, खोपोली, गोरेगाव, पनवेल आणि उरण अशी आडवीतिडवी पसरली आहे. कार्यालयीन वेळांमध्ये गाड्यांच्या दारांवर लटकत शेकडो प्रवासी जीव धोक्यात टाकून प्रवास करतात



पण रेल्वेचाच पर्याय निवडतात. रेल्वेच्या सर्व गाड्या १२ डब्यांच्या आहेत. मोजक्या गाड्या १५ डब्यांच्या आहेत. पण ही व्यवस्था अपुरी पडत आहे. गर्दी हाताळणे आजही रेल्वेसाठी आव्हान आहे. यामुळेच छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कल्याण आणि चर्चगेट ते विरार या दोन मार्गांसाठी भुयारी रेल्वेबाबत विचार सुरू आहे. सध्याची व्यवस्था सुरू ठेवून ही अतिरिक्त व्यवस्था सुरू करता येईल का याचीही चाचपणी सुरू आहे.मुंबईत जागेची टंचाई आहे. रेल्वेचा विस्तार करायचा तर भूसंपादनासाठीच अब्जावधींचा खर्च होईल अशी स्थिती आहे. शिवाय अतिक्रमण हटवणे, नागरिकांचे पुनर्वसन करणे हे सर्व खर्चिक काम आहे. या खर्चात बचत करण्यासाठीच भुयारी मार्गांचा विचार सुरू आहे. या प्रकारात सामान्य रेल्वे विस्तार योजनेच्या तुलनेत कमी भूसंपादन करुनही रेल्वेचा विस्तार शक्य होईल. यामुळेच भुयारी मार्गाच्या व्यावहारिकतेची चाचपणी सुरू आहे.सध्या पश्र्चिम रेल्वेद्वारे सुमारे ३० लाख तर मध्य रेल्वेवर छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते कसारा, कर्जत पर्यंत सुमारे ३८ लाख प्रवासी प्रवास करतात. या गर्दीला सुयोग्य पद्धतीने हाताळण्यासाठी तसेच प्रवास अधिक सुरळीत करण्यासाठी भुयारी रेल्वे हा एक चांगला पर्याय ठरू शकतो असे तज्ज्ञांचे मत आहे. भुयारी रेल्वेमुळे रुळ ओलांडताना होणारे अपघात टाळण्यासही मदत होणार आहे. भुयारी मार्ग तयार झाल्यास प्रवाशांना सुरक्षित प्रवेश किंवा बाहेर पडण्याची व्यवस्था करता येईल आणि लोकल, मेल-एक्सप्रेस, मालगाड्यांसाठीही स्वतंत्र मार्ग करण्यास मदत होईल. या सर्व बाबींचा विचार करून मुंबई रेल्वे विकास महामंडळाने चर्चगेट ते मुंबई सेंट्रल या पहिल्या टप्प्याच्या भुयारी रेल्वेच्या तांत्रिक तसेच आर्थिक गोष्टींचाही अभ्यास सुरू केला आहे. अंतिम निर्णय केंद्र आणि राज्य सरकार रेल्वेशी समन्वय राखून घेणार आहेत.

# तब्बल १८० ड्रोन पाडले, अमेरिकन एफ-३५लाही लक्ष्य केल्याचा इराणचा दावा

**वृत्तसंस्था**

**तेहरान :** इराणने पुन्हा एकदा आपल्या लष्करी क्षमतेबाबत मोठा दावा केला आहे. इराणी संसदेचे अध्यक्ष मोहम्मद बाकर गालिबाफ यांनी सांगितले की, त्यांच्या दलांनी सुमारे १८० ड्रोन निष्क्रिय केले असून अमेरिकेच्या एफ-३५ स्टेल्थ फायटर जेटलाही लक्ष्य केले. ही एखादी एकदाच घडलेली घटना नसून, इराणच्या तांत्रिक आणि रणनीतिक क्षमतेचे उदाहरण असल्याचे त्यांनी म्हटले. इराणच्या वृत्तसंस्थेनुसार, गालिबाफ यांनी वॉशिंग्टनसोबत सुरू असलेल्या अप्रत्यक्ष चर्चेच्या सध्याच्या स्थितीबाबत अधिकाऱ्यांना माहिती देताना हे वक्तव्य केले. गालिबाफ म्हणाले की, एफ-३५




सारख्या आधुनिक फायटर जेटला लक्ष्य करणे म्हणजे संरक्षण तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात इराण वेगाने पुढे जात असल्याचे द्योतक आहे. त्यांच्या मते, ही कारवाई अनेक स्तरांवर नियोजनबद्ध करण्यात आली होती.मात्र, या दाव्यांची स्वतंत्रपणे पुष्टी झालेली नाही आणि यापूर्वीही अमेरिकेने असे दावे फेटाळून लावले आहेत. काही अहवालांमध्ये असे समोर आले होते की, एका अमेरिकन एफ-३५ ला मोहिमेदरम्यान नुकसान झाले होते आणि त्याला आपत्कालीन लँडिंग करावी लागली होती.इराणने असा दावाही केला की, त्यांनी अमेरिका आणि तिच्या सहयोगींशी संबंधित सुमारे १८० ड्रोन पाडले. यापूर्वीही इराणने मोठ्या संख्येने ड्रोन अडविल्याचा दावा अनेकदा केला आहे. हा दावा अशा वेळी करण्यात आला आहे, जेव्हा या प्रदेशात ड्रोन आणि हवाई कारवाया युद्धाचा महत्त्वाचा भाग बनल्या आहेत. गालिबाफ यांनी असेही सांगितले की, अमेरिकेसोबतच्या चर्चेत काही मुद्द्यांवर सहमती झाली आहे, मात्र अनेक मोठे मतभेद अजूनही कायम आहेत. त्यांनी दावा केला की, पाश्र्चात्य देशांचा दबाव निष्फळ ठरला असून आता चर्चेचा मार्ग स्वीकारला जात आहे.इराणी संसदेच्या अध्यक्षांनी अलीकडील युद्धविरामाबाबत म्हटले की, हा इराणच्या रणनीतिक विजयाचा परिणाम आहे, तर अमेरिकेने तो वेगळ्या दृष्टिकोनातून स्वीकारला. त्यांनी असेही म्हटले की, शासन बदल घडवून आणणे किंवा इराणची लष्करी क्षमता संपवणे यांसारख्या आपल्या उद्दिष्टांत अमेरिका यशस्वी ठरली नाही

## 'ड्रॉप झोन' नेटवर्कचा विस्तार

पुणे : आपल्या 'ड्रॉप झोन' उपक्रमाच्या यशस्वी शुभारंभानंतर आसूस इंडिया ने देशभरातील आपल्या आणखी २२ स्टोअर्समध्ये हा उपक्रम सुरु करत या उपक्रमाच्या विस्तारीकरणाची घोषणा केली आहे. देशभरातील ग्राहकांना खरेदीपश्चात सुलभ, पारदर्शक आणि कार्यक्षम सेवेला पाठबळ देण्याबाबतची आपली वचनबद्धता कंपनीने या उपक्रमातून आणखी मजबूत केली आहे. ग्राहकांचा उत्पादन वापराचा अनुभव अधिक उंचावण्यावर भर देत 'ड्रॉप झोन' उपक्रम ग्राहकांना त्यांचे लॅपटॉप दुरुस्तीसाठी 'आसस एक्सक्लुझिव्ह स्टोअर्स'मध्ये जमा करण्याची सुविधा प्रदान करत आहे. यामुळे ग्राहकांना खास सर्व्हिस सेंटर्सवर जाण्याची गरज उरलेली नाही.

## दिल्ली पब्लिक स्कूलची उत्कृष्ट कामगिरीची

नाशिक - दिल्ली पब्लिक स्कूल, नाशिक आपल्या इयत्ता १० वीच्या विद्यार्थ्यांनी सीबीएसई बोर्ड परीक्षेत (२०२५–२६) केलेल्या उत्कृष्ट कामगिरीची अभिमानाने घोषणा करत आहे. ही कामगिरी शाळेच्या शैक्षणिक उत्कृष्टतेप्रती असलेल्या अटूट कटिबद्धतेचेच प्रतिबिंब आहे.या परीक्षेला एकूण १९८ विद्यार्थी बसले होते आणि त्यांनी १००% असा लक्षणीय निकाल नोंदवला. हे यश विद्यार्थी, शिक्षक आणि पालक या सर्वांच्याच समर्पणाचा आणि मेहनतीचा पुरावा आहे. या तुकडीने ४९४ गुणांची सर्वोच्च कामगिरी नोंदवली, तर सरासरी गुण ४३४.२३ इतके राहिले; हे संपूर्ण तुकडीमध्ये दिसून येणाऱ्या सातत्यपूर्ण शैक्षणिक यशाचे द्योतक आहे.

## एचडीएफसी बँक लिमिटेड ने 10.9% नफा वाढ नोंदवली

मुंबई: एचडीएफसी बँक लिमिटेड ने 31 मार्च 2026 रोजी समाप्त झालेल्या तिमाही आणि आर्थिक वर्षासाठी आपले आर्थिक निकाल जाहीर केले असून महसूल वाढ आणि स्थिर मालमत्ता गुणवत्तेमुळे बँकेची कामगिरी मजबूत राहिली आहे. आर्थिक वर्ष 26 साठी बँकेचे एकूण निव्वळ उत्पन्न ₹1,912.2 अब्ज इतके झाले असून आर्थिक वर्ष 25 मधील ₹1,683.0 अब्जच्या तुलनेत वाढ झाली आहे. याच कालावधीत निव्वळ नफा 10.9% वाढून ₹746.7 अब्ज झाला आहे. संचालक मंडळाने प्रति इक्विटी शेअर ₹13.0 अंतिम लाभांश जाहीर करण्याची शिफारस केली असून आर्थिक वर्ष 26 साठी एकूण लाभांश ₹15.5 प्रति शेअर इतका असेल.

## आईसगेट 2.0 वर कस्टम ड्युटी पेमेंट सुविधा सुरू

पुणे : आयडीएफसी फर्स्ट बँक ने आज आपल्या वैयक्तिक आणि व्यावसायिक ग्राहकांसाठी विशेष सेवांच्या सुरुवातीची घोषणा केली असून, आईसगेट 2.0 सोबतच्या एकत्रीकरणाद्वारे कस्टम ड्युटी, सेंट्रल एक्साईज आणि सर्व्हिस टॅक्सचे अखंड डिजिटल पेमेंट सक्षम केले आहे. या एकत्रीकरणामुळे ग्राहकांना आईसगेट पोर्टलद्वारे सहजपणे कर भरता येतो आणि आयडीएफसी फर्स्ट बँक च्या रिटेल व कॉर्पोरेट इंटरनेट बँकिंग प्लॅटफॉर्मद्वारे व्यवहार पूर्ण करता येतात, ज्यामुळे सुरक्षित, कार्यक्षम आणि पूर्णपणे डिजिटल अनुभव मिळतो. या प्लॅटफॉर्मवर रिअल-टाइम व्यवहार पुष्टीकरण, सोपी आणि सुलभ ऑनलाइन प्रक्रिया, तसेच नोंदवही व समायोजनासाठी तत्काळ डाउनलोड करता येणारे चलान उपलब्ध आहे.

## नवनीततर्फे नारुटो कलेक्शनचे अनावरण

छत्रपती संभाजीनगर:-नवनीत समूहाच्या 'युवा'या स्टेशनरी ब्रँडतर्फे अधिकृत नारुटो कलेक्शन ही प्रीमियम लाँगबुक्स, नोटबुक्स, स्पायरल लाँगबुक्स आणि ड्रॉइंग बुक्स यांचा समावेश असलेली ही विशेष श्रेणी लाँच केल्याची घोषणा करण्यात आली आहे. या सीरिजच्या माध्यमातून 'विल ऑफ फायर'ची प्रेरणादायी भावना थेट वर्गखोलीपर्यंत पोहोचवण्यात आली आहे. युवाची उच्च प्रतीची कागदी उत्पादने आणि नारुटोचे वैशिष्ट्यपूर्ण जग यांची सांगड घालत ही श्रेणी तयार करण्यात आली आहे. प्रत्येक विद्यार्थी आणि वापरकर्त्याला शिनोबीसारखे चिकाटीने आपले ध्येय साध्य करण्यासाठी प्रेरित करणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

## ५ किलो गॅस सिलिंडरचा पुरवठा वाढवला

पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने देशभरातील स्थलांतरित कामगार आणि गरजू लोकांसाठी स्वयंपाकाचा गॅस सहज आणि स्वस्त दरात उपलब्ध करून देण्यासाठी महत्त्वपूर्ण निर्णय घेतला आहे. ५ किलोच्या छोट्या 'फ्रि ट्रेड एलपीजी' सिलेंडरच्या उपलब्धतेत मोठी वाढ केली आहे. पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायू मंत्रालयाने एक महत्त्वपूर्ण पाऊल उचलले आहे. ७ एप्रिलपासून सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांसाठी सिलेंडर पुरवठ्यावरील निर्बंध काढून टाकण्यात आले आहेत. आता ५ किलोच्या सिलेंडरचा दैनंदिन पुरवठा दुप्पट करण्यात आला आहे. मार्च महिन्यातील वाढती मागणी लक्षात घेता हा निर्णय घेण्यात आला. यामुळे विशेषतः शहरी तसेच निमशहरी भागातील गॅस टंचाई दूर होण्यास मदत होणार आहे.

# महिलांसाठी ई-टॉयलेट सुविधा; स्थायी समिती सभापतींच्या पुढाकारातून पायलट प्रकल्पाला सुरुवात



**छत्रपती संभाजीनगर** | शहरातील महिलांसाठी स्वच्छता सुविधा अधिक सक्षम करण्याच्या उद्देशाने स्थायी समितीचे सभापती श्री. अनिल मकरिये यांच्या पुढाकारातून ई-टॉयलेट सुरू करण्यासंदर्भात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. ही बैठक मनपा आयुक्त श्री. अमोल येडगे यांच्या उपस्थितीत महानगरपालिकेत आयोजित करण्यात आली.

बैठकीत तात्काळ निर्णय घेत प्रारंभी दोन ई-टॉयलेटची चाचणी पायलट प्रकल्प म्हणून राबविण्याचे निश्चित करण्यात आले. महिलांच्या सोयीसाठी ही सुविधा प्राधान्याने सुरू करण्यात येणार आहे. यावेळी बोलताना सभापती श्री. अनिल मकरिये म्हणाले, "शहरातील महिलांना स्वच्छ, सुरक्षित आणि सुलभ शौचालय सुविधा उपलब्ध करून देणे ही महानगरपालिकेची जबाबदारी आहे. ई-टॉयलेटसारख्या आधुनिक सुविधांमुळे महिलांच्या दैनंदिन गरजा सुलभ होतील. हा पायलट प्रकल्प यशस्वी झाल्यानंतर शहरभर अशा सुविधा टप्प्याटप्प्याने वाढविण्यात येतील." शहरातील गुलमंडी चौक आणि उस्मानपुरा या दोन प्रमुख ठिकाणी ही ई-टॉयलेट सुविधा लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली. यावेळी गलिच्छ वस्ती सुधार समिती सभापती जालिंदर शेंडगे, शहर अभियंता संजय कोंबडे, शंकर म्हात्रे, किशोर मानकापे, सागर नीलकंठ आदींची उपस्थिती होती.

# "इच्छापत्र (Will)" जनजागृती सेमिनार संपन्न

**छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी)** | महावीर इंटरनेशनलच्या वतीने महावीर भवन येथे दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ ते १० या वेळेत "इच्छापत्र (Will)" विषयावर मार्गदर्शनपर सेमिनार उत्साहात पार पडला. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

या सेमिनारला संस्थेचे अनेक वरिष्ठ पदाधिकारी व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रमुख उपस्थितांमध्ये पुखराज पगारिया, मिठालाल कांकरीया, जी. एम. बोथरा, हर्षवर्धन जैन, पारस ताथेड, पारस छाजेड, गौतम संचेती, अनिलमामा संचेती, राजेश कांकरीया, महावीर पाटणी, प्रकाश मुगदिया, दिलीप मुगदिया, हेमलता मुगदिया, विमलाराणी बाफना आदींचा समावेश होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन भक्ती संकलेचा यांनी प्रभावीपणे केले.

कार्यक्रमाची सुरुवात भक्तिगीत व दीपप्रज्वलनाने करण्यात आली. त्यानंतर प्रमुख वक्त्यांचा परिचय करून देण्यात आला. मुख्य वक्ते म्हणून ॲड. अमोल काकडे, ॲड. रामेश्वर तोतला, सीए हुंडीवाला, वीर कैलाश बाफना, वीर डॉ. नंदलाल बोथरा, वीर सागर मुगदिया, वीर विकास पाटणी व वीर तेजस कमानी मंचावर उपस्थित होते.

सर्वप्रथम ॲड. अमोल काकडे यांनी इच्छापत्र म्हणजे व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्याची संपत्ती कोणाला आणि कशा प्रकारे वाटप करायची याचे कायदेशीर दस्तऐवज असल्याचे स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की इच्छापत्र केल्यास कौटुंबिक वाद टाळता येतात तसेच वारसांना योग्य मार्गदर्शन मिळते. इच्छापत्र नसल्यास मालमत्तेचे वाटप कायद्याच्या प्रक्रियेनुसार होते, ज्यामुळे अनेकदा वाद निर्माण होऊ शकतात.

यानंतर सीए हुंडीवाला यांनी आयकर आणि आर्थिक नियोजनाच्या दृष्टीने इच्छापत्राचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की योग्य पद्धतीने तयार केलेले इच्छापत्र भविष्यातील आर्थिक अडचणी कमी करते आणि संपत्तीचे नियोजन सुलभ करते.

ॲड. रामेश्वर तोतला यांनी धार्मिक ग्रंथांतील तसेच उद्योगक्षेत्रातील उदाहरणे देत इच्छापत्र नसल्यास होणारे नुकसान स्पष्ट केले. त्यांनी सांगितले की, कायदेशीर सल्लागारांच्या मार्गदर्शनाखाली योग्य पद्धतीने इच्छापत्र तयार करणे अत्यंत आवश्यक आहे.

वक्त्यांनी इच्छापत्र तयार करताना खालील बाबींचा विशेष उल्लेख केला:

इच्छापत्र लेखी स्वरूपात स्पष्ट व समजण्यास सोपे असावे

दोन साक्षीदारांची सही आवश्यक असते

वेळोवेळी इच्छापत्रात बदल (update) करता येतो

इच्छापत्र नोंदणी (registration) केल्यास अधिक सुरक्षितता मिळते

संपत्तीचे स्पष्ट तपशील व वारसांची माहिती नमूद करणे गरजेचे

कार्यक्रमादरम्यान उपस्थितांनी चर्चासत्रात उत्स्फूर्त सहभाग नोंदवून विविध शंकांचे निरसन करून घेतले. समारोप प्रसंगी वीर सागर मुगदिया यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी योगदान देणाऱ्या सर्व दानशूर व सहकाऱ्यांचे आभार मानले.

हा सेमिनार नागरिकांमध्ये इच्छापत्राबाबत जागरूकता निर्माण करणारा ठरला असून भविष्यात अशा उपक्रमांची गरज असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

# पिता-पुत्राला जन्मठेपेची शिक्षा; खुनाच्या गुन्ह्यात अतिरिक्त सत्र न्यायालयाचा निकाल

**तभा.वृत्तसेवा**

**छत्रपती संभाजीनगर, दि.१९ एप्रिल** | सोयगाव येथे जुन्या वादातून एका दांपत्यावर पिता,पुत्राने कोयत्याने वार केले. यात गंभीर जखमी शेतकऱ्याचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या प्रकरणात आरोपी ज्ञानेश्वर रामदास चौधरी (वय.५०) आणि हेमंत ज्ञानेश्वर चौधरी (वय. २१,दोघे रा.सोयगाव) यांना जन्मठेप आणि प्रत्येकी २५ हजारांच्या दंडाची शिक्षा जिल्हा व सत्र न्यायाधीश आर.डी. खेडेकर यांनी ठोठावली.

मनीषा सुनील चौधरी (रा.चौधरी गल्ली सोयगाव) यांनी तक्रार दिली होती. त्यानुसार,तक्रारदार आणि त्यांचे पती सुनील चौधरी हे १७ जुलै २०२१ रोजी सायंकाळी शेतातील काम आटोपून दुचाकीने घरी परतत होते.त्यांचा मुलगा कार्तिक सायकलवरून मागून येत होता. लिहातांडा ते सोयगाव रस्त्यावर ज्ञानेश्वर आणि त्याचा मुलगा हेमंत यांनी त्यांना अडवले. जुन्या भांडणावरून दोघांनी शिवीगाळ करत अचानक हल्ला चढवला.ज्ञानेश्वरने कोयत्याने सुनील यांच्या डोक्यावर जोरदार वार केला.त्यानंतर खाली कोसळलेल्या सुनील यांना हेमंतने गळा आणि चेहऱ्यावरही वार करीत गंभीर जखमी केले. पतीला वाचवण्यासाठी मनीषा आल्या असता त्यांच्यावरही ज्ञानेश्वरने कोयत्याने वार केला. हल्ल्यानंतर सुनील रक्ताच्या थारोळ्यात बेशुद्ध पडले. स्थानिकांच्या मदतीने त्यांना तातडीने हॉस्पिटलमध्ये दाखल केले.परंतु, उपचारादरम्यान

त्यांचा मृत्यू झाला.प्रकरणात सोयगाव पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला होता.खटल्याच्या सुनावणीवेळी सहायक लोकाभियोक्ता बाळासाहेब महेर यांनी ११ साक्षीदारांचे जबाब नोंदवले.त्यात सिव्हिल हॉस्पिटलचे डॉक्टर आणि तक्रारदार यांची साक्ष महत्त्वाची ठरली.सुनावणीअंती न्यायालयाने दोघा आरोपींना दोषी ठरवून भादंवि कलम ३०२ अन्वये जन्मठेप आणि प्रत्येकी २५ हजार रुपये दंडाची शिक्षा आणि कलम ५०६,३४ अन्वये दोन वर्षांच्या कारावासाची शिक्षा ठोठावली. दोन्ही शिक्षा आरोपींनी एकत्र भोगावयाच्या आहेत.प्रकरणात पैरवी अधिकारी म्हणून हवालदार नितीन जाधव यांनी काम पाहिले.

## पोलीस भरतीसाठी निघालेल्या तरुणाचा अपघाती मृत्यू; कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर नांदगाव ताडा येथील घटना

**तभा.वृत्तसेवा**



**सोयगाव,दि.१९ एप्रिल** | पोलीस भरतीसाठी तयारी करणाऱ्या तरुणाचा अपघाती मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना शुक्रवारी दि. १७ शुक्रवार रोजी घडली.बबलू तालेब पठाण (वय.२४) असे मृत तरुणाचे नाव असून,तो सोयगाव तालुक्यातील नांदगाव तांडा येथील रहिवासी होता. मिळालेल्या माहितीनुसार,बबलू पठाण हा धुळे येथे पोलीस भरतीच्या अनुषंगाने जाण्यासाठी निघाला होता.शिरूर चौफुली परिसरात त्याचा अपघात होऊन त्यात त्याचा मृत्यू झाला.या घटनेमुळे नांदगाव तांड्यावर शोककळा पसरली आहे.मृत बबलू हा शेतकरी कुटुंबातील असून,कुटुंबाची आर्थिक परिस्थिती हलाखीची होती. तीन एकर शेतीवर कुटुंबाचा उदरनिर्वाह चालत होता.त्याच्या पश्चात आई,वडील,दोन भाऊ व दोन बहिणी असा परिवार आहे. कुटुंबातील जबाबदाऱ्या लक्षात घेऊन त्याने पोलीस भरतीसाठी अनेक दिवसांपासून मेहनत घेतली होती.याच उद्देशाने त्याने विवाहही पुढे ढकलला होता. कुटुंबियांच्या इच्छेनुसार त्याचा साखरपुडाही झाला होता.

शुक्रवारी नमाज अदा केल्यानंतर तो धुळे येथे जात असताना हा अपघात झाला. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.एका होतकरू तरुणाचा अशा प्रकारे अकाली मृत्यू झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. मृतदेहावर अंत्यसंस्कार नांदगाव तांडा येथील दफनभूमीत करण्यात आले.या घटनेमुळे संपूर्ण गावावर शोककळा पसरली असून,परिसरात सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## बिडकीन येथे भगवान परशुराम जयंती उत्साहात साजरी



तभा वृत्तसेवा बिडकीन दि १९ एप्रिल जय श्रीराम जय परशुराम यांची दि.१९ एप्रिल रविवार रोजी बिडकीन येथील कोकणवेस मारोती मंदिर येथे भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन प्रमुख मान्यवारांच्या उपस्थितीत महाआरती करण्यात आली या प्रसंगी बिडकीन सरपंच अशोक धर्मे उपसरपंच किरण , काकासाहेब टेके बिडकीन भा ज पा तालुकाध्यक्ष तथा माजी जिल्हा परिषद सदस्य विजय चव्हाण विकास गोर्डे मधुकर सोकटकर, अमोल कोथिंबीर अंकुश धर्मे डॉ गणेश शिंदे, नंदकुमार वैद्य, रवींद्र गायकवाड विजय शेजुळ किशोर धर्मे रवींद्र ठाणगे, बाबा धर्मे विकास चव्हाण आंबीलवादे , राजेंद्र वैद्य, बापू खराडकर, संजय देवळाणकर, आदी मान्यवरांची उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ त्रिंबक पडळकर यांनी केले व आभार प्रदर्शन बिडकीन ब्राह्मण संघटनेचे अध्यक्ष अविनाश जोशी यांनी केले.

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सकल ब्राह्मण समाज व ब्राह्मण जाई समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता

## हृदयविकाराच्या झटक्याबाबतचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न

छत्रपती संभाजीनगर : तुम से तुम तक या मालिकेतून हृदयविकाराच्या झटक्याबाबतचे गैरसमज दूर करण्याचा प्रयत्न केला जात आहे. आगामी भागात आर्यवर्धन (शरद केळकर) याला झटका येत कथानकाला नवे वळण मिळते. मात्र, या प्रसंगाचे चित्रण वास्तववादी ठेवत 'हृदयविकार म्हणजे शेवट नव्हे' हा सकारात्मक संदेश देण्यात आला आहे. योग्य उपचार, काळजी आणि जीवनशैलीत बदल केल्यास रुग्ण पुन्हा सक्रिय जीवन जगू शकतो, असे मालिकेतून अधोरेखित होते. या ट्रॅकद्वारे प्रेक्षकांमध्ये आरोग्याबाबत जागरूकता निर्माण करण्यावर निर्मात्यांचा भर आहे. मालिका दररोज रात्री ८.३० वाजता झी टीव्हीवर प्रसारित होते.


सोलापूर तरुण भारत

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGED MY NAME FROM OLD NAME
SHAIKH SANIYA SHAIKH SHABBIR
NEW NAME
SHAIKH SANIYA ISRAR
**Address -** MAKRANPUR, TQ KANNAD, DIST AURANGABAD MAHARASHTRA 431103

# 'मागोवा' या भाषाविषयक ग्रंथाचे 'सभु'मध्ये २१ एप्रिलला प्रकाशन

### मराठी प्रमाणलेखनाच्या अभ्यासाला मिळणार नवा आयाम!




**छत्रपती संभाजीनगर/ प्रतिनिधी** | मराठी प्रमाणलेखनाची अद्ययावत आणि अभ्यासपूर्ण नोंद घेणारा आणि भाषा अभ्यासाला एक नवा आयाम देणारा डॉ. नागेश अंकुश यांनी लिहिलेला 'प्रमाण मराठी भाषेच्या प्रमाणलेखनाचा इतिहास' हा ग्रंथ मंगळवारी, २१ एप्रिल २०२६ रोजी प्रकाशित होत आहे.

श्रीसरस्वती भुवन शिक्षण संस्था संचलित सरस्वती भुवन कला व वाणिज्य महाविद्यालय आणि राजहंस प्रकाशन, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सायंकाळी ५.३० वाजता स. भु. परिसरातील गोविंदभाई श्रॉफ ललित कला अकादमीच्या सभागृहात हा समारंभ होणार आहे.

प्राचार्य लेखक डॉ. विवेक मिरगणे अध्यक्षस्थानी असतील. समीक्षक व भाषा अभ्यासक डॉ. केशव तुपे ( प्राध्यापक, शासकीय ज्ञान- विज्ञान महाविद्यालय, अमरावती) यांची प्रमुख उपस्थिती राहणार असून, भाषा संशोधक डॉ. आनंद काटीकर (मराठी विभाग प्रमुख ,फर्ग्युसन महाविद्यालय, पुणे) हे या ग्रंथाविषयी भाष्य करणार आहेत. ९२ वर्षीय ज्येष्ठ समीक्षक डॉ. सुधीर रसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली सिद्ध झालेल्या या ग्रंथाला शंभरी पूर्ण करणाऱ्या ज्येष्ठ भाषातज्ज्ञ यास्मिन शेख यांची दीर्घ प्रस्तावना आहे.

या समारंभासाठी भाषा आणि साहित्य

## हदगाव नगरपरिषद हदगाव ता. हदगाव जि. नांदेड

Email id-cohadgasilcom स्थापना १९५४

ह.न.प.जा.क्र./बा.वि./290/2026 दिनांक 17/04/2026

### ई-निविदा प्रसिद्धीकरण सूचना
### (नागरी दलीत्तेत्तर सुधार वस्ती योजना )

मुख्याधिकारी नगर परिषद हदगाव खालील विकास कामाची निविदा शासनाकडील नोंदणीकृत अनुभवी ठेकेदार अथवा अहर्तापत्र तांत्रिक बी-१ नमुन्यात हिद्वी लिफाफा पद्धतीने स्पर्धात्मक निविदाद्वारे मागविण्यात येत आहे.

| अनु क्र | कामाचे नाव | कामाची अंदाजित रक्कम | बयाणा रक्कम | सुरक्षा ठेव रक्कम | ठेकेदारा वा वर्ग | कामाचा कालावधी | ई-निविद फार्म फी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | नगर परिषद हदगाव येथील सुभद्रा नगर अंतर्गत नांदेड रोड ते कस्तूरी मंगल कार्यालयापर्यंत सी. सी. रस्त्याचे बांधकाम करणे. | 99,99,680 | 119953/- | करार करते वेळी 1% बिलातून 8% | वर्ग 4 व त्यावरील | 180 दिवस | 15000/- |
| 2. | नगर परिषद हदगाव येथील आझाद चौक ते भंगी गल्ली पर्यन्त सी. सी. रस्त्याचे बांधकाम करणे. | 9,96,400/- | | | | | |
| 3. | नगर परिषद हदगाव येथील कमलाई नगर अंतर्गत धोंडे यांचे घर ते शेवडकर यांच्या घरापर्यंत सी. सी. रस्त्याचे बांधकाम करणे. | 9,99,200/- | | | | | |
| | | 1,19,95,285/- | | | | | |

अटी व शर्तीसह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्याwww.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि 17.04.2026 ते 12.05.2026 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दि. 12.05.2026 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील.

मुख्याधिकारी

CMYK



तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com

## संक्षिप्त वृत्त...

### राष्ट्रीय लोकअदालतीचे ९ मे रोजी आयोजन

**परभणी,/प्रतिनिधी :** महाराष्ट्र राज्य विधी सेवा प्राधिकरण, मुंबई यांच्या निर्देशानुसार शनिवारी (दि. ०९ मे) रोजी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन जिल्हा विधी सेवा प्राधिकरण, परभणी यांच्यामार्फत परभणी व हिंगोली जिल्ह्यातील संबंधित न्यायालय परिसरात करण्यात येणार आहे.

या राष्ट्रीय लोकअदालतीमध्ये न्यायालयातील सर्व प्रकारची तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे, भारतीय चलनक्षम दस्तऐवज अधिनियम १८८१ अंतर्गत चेक बाऊन्स प्रकरणे, बँक वसूली प्रकरणे, मोटार अपघात प्रकरणे, कौटुंबिक वाद, भू-संपादन प्रकरणे, वीज (चोरीची प्रकरणे वगळून) व पाणी आकार प्रकरणे तसेच इतर दिवाणी स्वरूपाची प्रकरणे आणि बँकांची वादपूर्व वसूली प्रकरणे ठेवण्यात येणार आहेत.

लोकअदालतीत मा. न्यायाधीश व वकील यांचे पॅनल पक्षकारांना मार्गदर्शन करून तडजोडीअंती जास्तीत जास्त प्रकरणे निकाली काढण्यास सहाय्य करणार आहे. या प्रक्रियेसाठी कोणतेही शुल्क आकारले जाणार नाही. ज्या नागरिकांची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित आहेत त्यांनी संबंधित न्यायालयात तसेच जिल्हा विधी सेवा प्राधिकरण व तालुका विधी सेवा समितीकडे ०९ मे २०२६ पूर्वी अर्ज सादर करून आपली प्रकरणे लोकअदालतीत ठेवण्यासाठी नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोक अदालतीचे फायदे : निकाली निघालेल्या प्रकरणांमध्ये कोर्ट फी परत मिळते. एकाच दिवशी निपटारा झाल्याने वेळ व खर्चाची बचत होते. दोन्ही पक्षकारांमध्ये समन्वयाने वाद मिटविल्यामुळे कटुता निर्माण होत नाही. राष्ट्रीय लोकअदालतीत जास्तीत जास्त तडजोडपात्र प्रकरणे ठेवून ती निकाली काढण्याचे आवाहन परभणी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश उज्वला म. नंदेश्वर यांनी केले आहे.

### जिल्ह्यात ९ खत विक्री केंद्रांचे परवाने निलंबित; कृषी विभागाची कारवाई

**परभणी,/प्रतिनिधी:** शेतकऱ्यांना दर्जेदार बियाणे, खते व कीटकनाशकांचा पुरवठा सुनिश्चित करण्यासाठी जिल्हा कृषी विभागाने तपासणी मोहिमेदरम्यान नियमांचे उल्लंघन करणाऱ्या जिल्ह्यातील ९ खत विक्री केंद्रांचे परवाने निलंबित करण्यात आले असून, अन्य २ परवानाधारकांना कडक समज देण्यात आली आहे.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांच्या दालनात आज पार पडलेल्या सुनावणीमध्ये संबंधित केंद्रचालकांनी सादर केलेले खुलासे असमाधानकारक आढळल्याने ही कारवाई करण्यात आली. तपासणी व सुनावणीदरम्यान अनेक गंभीर अनियमितता निदर्शनास आल्या. काही विक्रेत्यांनी ई-पॉस यंत्रणेतील व्यवहारात तफावत ठेवत कंपन्यांकडून प्राप्त 'ॲकनॉलेजमेंट' वेळेत स्वीकारले नव्हते. तसेच यंत्रणेमधील नोंदणीकृत साठा व प्रत्यक्ष साठा यामध्ये मोठी विसंगती आढळली. याशिवाय, विक्री केंद्रांवर शासन नियमानुसार आवश्यक असलेले भावफलक व साठाफलक अद्ययावत ठेवण्यात आले नव्हते. तसेच शेतकऱ्यांना खरेदीनंतर पक्की देयके न देणे व बिलांवर स्वाक्षरी न घेणे, अशा त्रुटीही आढळून आल्या.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकाऱ्यांनी या कारवाईद्वारे सर्व कृषी सेवा केंद्र चालकांना कडक इशारा दिला असून, नियमांचे उल्लंघन करून शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर कारवाई सुरूच राहणार असल्याचे स्पष्ट केले आहे. भविष्यात अशा प्रकारच्या अनियमितता पुन्हा आढळल्यास संबंधितांचे परवाने कायमस्वरूपी रद्द करण्यात येतील, असेही जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

### परभणी जिल्हयात २०-२२ एप्रिल दरम्यान अवकाळी वारे, गारपीठ,पावसाची शक्यता



**परभणी,/प्रतिनिधी:** पश्चिम महाराष्ट्र (प्रामुख्याने घाट परिसर), खानदेश, मराठवाडा आणि विदर्भाच्या काही भागांमध्ये २० ते २२ एप्रिल दरम्यान दुपारनंतर काही प्रमाणात आभाळी हवामान आणि मेघगर्जनेसह वादळी पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे. या कालावधीत विजांचा कडकडाट, पाऊस तसेच काही ठिकाणी गारपीट होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सध्याच्या हवामान अंदाजानुसार १९ एप्रिल रोजी पश्चिम महाराष्ट्रातील घाट परिसर, तसेच उत्तर खानदेश आणि दक्षिण मराठवाड्यातील काही भागांमध्ये दुपारनंतर वादळी पावसाची शक्यता आहे. त्यानंतर २० आणि २१ एप्रिल रोजी पावसाच्या क्षेत्रात वाढ होण्याचे संकेत आहेत, ज्यामुळे पश्चिम महाराष्ट्रासह (पुणे विभाग) मराठवाडा (प्रामुख्याने दक्षिण भाग आणि छत्रपती संभाजीनगर विभाग) आणि विदर्भात (प्रामुख्याने अमरावती विभाग) देखील काही प्रमाणात वादळी पाऊस पडेल. मात्र २२ तारखेला वादळी पावसाच्या क्षेत्रात आणि तीव्रतेत घट होईल.

कृषी विभागाकडून शेतकऱ्यांना आवाहन करण्यात येत आहे की, संभाव्य हवामान बदल लक्षात घेऊन तातडीने योग्य ती प्रतिबंधात्मक उपाययोजना करावी: शेतकऱ्यांनी शेतीची कामे हवामानानुसार नियोजित करावीत काढणी केलेली पिके सुरक्षित ठिकाणी साठवावीत किंवा ताडपत्री/झाकणाने सुरक्षित ठेवावीत वादळी वारे, पाऊस आणि संभाव्य गारपीट यापासून पिकांचे नुकसान टाळण्यासाठी आवश्यक ती खबरदारी घ्यावी शेतमाल, भाजीपाला व इतर काढणी केलेले उत्पादन मोकळ्यावर ठेवू नये

# बालविवाहाची शंका आल्यास तात्काळ कारवाई करा- महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर

## परभणी जिल्हयात बालविवाह आढळल्यास तात्काळ १०९८ किंवा ११२ वर संपर्क करा

**परभणी,/प्रतिनिधी-** अक्षय तृतीया या शुभमुहूर्तावर राज्यात मोठ्या प्रमाणावर विवाह सोहळ्यांचे आयोजन होत असल्याने बालविवाह रोखण्यासाठी राज्य प्रशासनाने कडक पावले उचलली आहेत.

राज्याच्या महिला व बालविकास राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्यस्तरीय बैठक व्हीसी द्वारे संपन्न झाली. सदर बैठकीस राज्याचे महिला व बालविकास आयुक्त, सर्व जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक व जिल्हा महिला व बालविकास अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत ग्रामस्तरापासून जिल्हास्तरापर्यंत विविध यंत्रणांना सतर्क राहण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

राज्यातील सर्व सरपंच, पोलीस पाटील, ग्रामसेवक आणि अंगणवाडी सेविका यांना गावामध्ये होणाऱ्या विवाहांपूर्वी मुलगा व मुलगी यांच्या वयाची खात्री करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेषतः अक्षय तृतीयेच्या दिवशी होणाऱ्या विवाह सोहळ्यांवर लक्ष ठेवून बालविवाह होणार नाही यासाठी पोलीस विभाग व स्थानिक प्रशासनाला समन्वयाने काम करण्यास सांगितले आहे. तालुका व ग्रामस्तरावर विशेष पथके स्थापन करून देवस्थान, मंगल कार्यालये आणि इतर विवाहस्थळांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येणार आहे. बालविवाहाचे कोणतेही प्रकरण



आढळल्यास तत्काळ गुन्हा दाखल करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत. जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली महसूल, पोलीस व शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांच्या बैठका घेऊन जिल्हानिहाय कृती आराखडे तयार केले जात आहेत. सर्व तहसीलदार व गटविकास अधिकाऱ्यांना या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याचे निर्देश आहेत. याशिवाय, विवाहाशी संबंधित सेवा देणारे जसे की मंगल कार्यालये, केटरर्स, प्रिंटिंग प्रेस, फोटोग्राफर, वाजंत्री तसेच धर्मगुरू यांनी मुलगा-मुलगी यांच्या वयाची खात्री केल्याशिवाय कोणतीही सेवा देऊ नये, अन्यथा त्यांच्यावरही कायदेशीर कारवाई होणार आहे. बालविवाहाविरोधात जनजागृती वाढवण्यासाठी गावोगावी दवंडी, पोस्टर मोहीम, विशेष ग्रामसभा, शाळांमध्ये पालक बैठक तसेच महिला बचत गटांच्या माध्यमातून प्रचार केला जाणार आहे.

दरम्यान, नागरिकांना आवाहन करण्यात आले आहे की, बालविवाहासंदर्भातील कोणतीही माहिती चाईल्ड हेल्पलाईन १०९८ किंवा डायल ११२ वर द्यावी. माहिती देणाऱ्याचे नाव गोपनीय ठेवले जाईल, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. राज्यात बालविवाहास आळा घालण्यासाठी प्रशासनाने सुरू केलेल्या या मोहिमेला समाजातील सर्व घटकांनी सहकार्य करणे आवश्यक असल्याचे आवाहन राज्यमंत्री मेघना साकोरे-बोर्डीकर यांनी केले आहे.



**जिंतूर-जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांची जयंती ग्रामपंचायत कार्यालय इटोली या ठिकाणी गावकरी मंडळी चा मोठा सहभाग या जयंती मध्ये होता सरपंच उपसरपंच व सर्व सन्माननीय ग्रामपंचायत सदस्य व गावकरी बोलकी येथील सरपंच जगदीश राव घुगे पाटील स्वामी सरव गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित गावकरी मंडळी दिसत आहेत.**

## परभणी तालुक्यातील खरीप २०२५ पिक विमा तातडीने मंजूर करा : शिवसेनेची मागणी : जिल्हा प्रशासनास निवेदन

**परभणी,/प्रतिनिधी :** परभणी जिल्ह्यातील खरीप हंगाम २०२५ मधील सोयाबीन व कापूस पिकांना विमा मंजूर करून तत्काळ वितरण करावे, अशी मागणी शिवसेनेच्या वतीने जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना सादर केलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

परभणी तालुक्यातील खरीप हंगाम २०२५ मध्ये सोयाबीन व कापूस पिकांसाठी विमा संरक्षण घेतलेल्या शेतकऱ्यांना अद्याप विमा रक्कम मिळालेली नसल्याने नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. नियमानुसार वेळेत विमा हप्ता भरूनही शेतकरी प्रत्यक्ष लाभापासून वंचित राहिल्याने आर्थिक अडचणी अधिकच तीव्र झाल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शिवसेना जिल्हाप्रमुख आनंद भरोसे यांच्या मार्गदर्शनाखाली व तालुकाध्यक्ष प्रभाकर कदम यांच्या नेतृत्वात सुभाष गरुड, लक्ष्मण आरमळ, लक्ष्मण कराळे, प्रताप कदम, शिवम देशमुख, शुभम देशमुख, श्याम देशमुख, सुधाकर देशमुख, विठ्ठल गरुड, अर्जून देशमुख, श्रीकांत देशमुख, प्रताप देशमुख, विनायक देशमुख, शहाबुद्दीन वजीर शेख, ज्ञानेश्वर रसाळ आदींच्या शिष्टमंडळाने शनिवार १८ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी व जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी यांना एक तपशीलवार निवेदन सादर केले. त्याद्वारे, संबंधित पिक विमा योजनेअंतर्गत () या कंपनीची नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, परभणी तालुक्यातील पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होऊनही विमा मंजुरीबाबत अद्याप कोणतीही ठोस कार्यवाही झालेली नाही. विशेष म्हणजे, जिल्ह्यातील इतर तालुक्यांमध्ये विमा रक्कम मंजूर करण्यात आली असल्याची माहिती समोर येत असताना, परभणी तालुक्यातील शेतकरी मात्र या लाभापासून वंचित आहेत, अशी खंत या निवेदनाद्वारे व्यक्त केली.

पिक विमा योजनेचा उद्देश नैसर्गिक आपत्तीमुळे झालेल्या नुकसानीपासून शेतकऱ्यांना आर्थिक आधार देणे हा असला, तरी प्रत्यक्षात होत असलेल्या विलंबामुळे शेतकऱ्यांचा विश्वास डळमळीत होत आहे. पिकांचे नुकसान झाल्याने आधीच अडचणीत असलेल्या शेतकऱ्यांना विमा रक्कम मिळण्यात होत असलेल्या दिरंगाईमुळे आणखी आर्थिक ताण सहन करावा लागत आहे, असे या निवेदनाद्वारे नमूद केले.

या पार्श्वभूमीवर शेतकरी वर्गातून प्रशासनाकडे तातडीने हस्तक्षेप करण्याची मागणी होत आहे. परभणी तालुक्यातील विमा प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधित कंपनीला प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्याचे निर्देश द्यावेत, तसेच पात्र शेतकऱ्यांच्या खात्यात विमा रक्कम तातडीने जमा करण्यात यावी, भविष्यात अशा प्रकारची विलंबाची पुनरावृत्ती होऊ नये यासाठीही ठोस उपाययोजना करावी, अशी मागणी या निवेदनाद्वारे करण्यात आली.

## गंगाखेड नगर परिषदेत अधिकाऱ्यांची जनगणना पूर्वतयारीची पाहणी

**गंगाखेड,/प्रतिनिधी-** नगर परिषद कार्यालयामध्ये जनगणना पूर्वतयारी संदर्भात माहितीची सखोल पडताळणी करण्यात आली.यासाठी सहायक संचालक व जिल्हा समन्वयक बी.प्रसाद तसेच जिल्हाधिकारी कार्यालयाच्या जनगणना कक्षाचे समन्वयक संदीप कुलकर्णी,अल्ताफ यांनी (दि.१ एप्रिल बुधवार) रोजी गंगाखेड नगर परिषद कार्यालयाला भेट दिली.यावेळी त्यांनी जनगणना प्रक्रियेतील विविध बाबींचा आढावा घेतला आणि प्रत्यक्ष कामकाजाची माहिती तपासून पाहिली संबंधित नोंदी,कागदपत्रे व माहिती प्रणालीची अचूकता याची खात्री करण्यात आली.या पाहणीदरम्यान कार्यालयीन अधीक्षक नागनाथ साळवे,अकाउंट विभागाचे सुरेश मणियार तसेच इतर कर्मचारी उपस्थित होते.

वरिष्ठ अधिकाऱ्यांनी गंगाखेड नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांना आवश्यक सूचना देत आगामी जनगणना प्रक्रिया सुरळीत व अचूक पार पाडण्याचे मार्गदर्शन केले.जगातील ही




सर्वात मोठी जनगणना दोन टप्प्यांत होणार असून पहिल्या टप्प्याला दिनांक १ एप्रिल बुधवार २०२६ पासून सुरूवात झाली आहे. ही जनगणना पहिल्यांदाच पूर्णपणे डिजिटल पद्धतीने केली जाणार आहे.तसेच नागरिकांना स्वतःहून माहिती भरण्याचा पर्यायही प्रथमच उपलब्ध करून दिला जाणार आहे.दुसरा टप्पा १६ मे ते १४ जून दरम्यान होणार आहे. जनगणना पूर्वतयारीचे हे काम वेळेत आणि काटेकोरपणे पूर्ण करण्यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने कार्य करावे,असेही यावेळी सूचित करण्यात आले.



**सांभाळून आमच्या वडिलांचा वारसा....विविध संकटाचा सामना करूनही पुन्हा जोमाने उभा राहत कामाला लागणार बळीराजा शेती पूर्व मशागतीच्या कामात व्यस्त आहे. दरम्यान, उन्हाळ्याच्या सुट्टीत वडिलोपार्जित शेतीत वडिलांसोबत बैलगाडी हाकण्याचा आनंद महागड्या कारमध्ये बसण्यापेक्षा काही वेगळाच असतो गंगाखेड तालुक्यातील बैलगाडीतून जाणाऱ्या मुलाच्या चेहऱ्यावरील हास्य सांगून जाते. (छाया- ज्ञानोबा कदम,गंगाखेड)**

## झरी येथे 'छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर' संपन्न

**परभणी ,/प्रतिनिधी:** झरी महसूल मंडळाच्या वतीने आयोजित करण्यात आलेले 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर' आज झरी येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडले.

नागरिकांना विविध शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित या शिबिराला पंचक्रोशीतील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने प्रतिसाद दिला.

अभियानाचे उद्घाटन जिल्हाधिकारी संजयसिंह चव्हाण यांच्या हस्ते झाले. यावेळी उपविभागीय अधिकारी उदयसिंह भोसले, तहसीलदार तहसीलदार राजकुमार राठोड यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच झरी जिल्हा परिषद सर्कलचे सदस्य दिलीपराव देशमुख, पंचायत समिती सदस्य प्रमोद गायकवाड, कृषिभूषण कांतराव देशमुख आणि एसबीआय बँकेचे व्यवस्थापक दिनेश कुमार झा हे मान्यवर उपस्थित होते.

यावेळी जिल्हाधिकारी श्री. चव्हाण यांनी बालविवाह कुप्रथा, सामाजिक भेदभाव, शेत रस्ते अडवणूक प्रवृत्ती, समाजातील भेदभाव, एक गाव एक स्मशानभूमी, अंधश्रद्धा निर्मूलन करण्याची गरज इत्यादी विषयांवर स्पष्ट मत व्यक्त केले. तसेच शेती पद्धतीसह वर्तमान समाजाचे असणाऱ्या सुधारणा यावर सविस्तर भाष्य केले.

'या समाधान शिबिरामध्ये पंचायत समिती, तालुका कृषी अधिकारी कार्यालय, उपअधीक्षक भूमी अभिलेख, आरोग्य विभाग, पशुसंवर्धन विभाग, दुय्यम निबंधक कार्यालय, एकात्मिक बाल विकास सेवा, महिला व बाल विकास विभाग, महाराष्ट्र ग्रामीण जीवन्नोती अभियान, ॲग्री स्टॅक योजना, ई-सेवा केंद्र, पुरवठा विभाग, आधार नोंदणी यांसह एकूण १६ विविध विभागांचे स्वतंत्र डेस्क उभारण्यात आले होते. त्यामुळे नागरिकांना विविध योजनांची माहिती व सेवा एका ठिकाणी सहज उपलब्ध झाली.

जिल्हाधिकारी यांच्या हस्ते लाभार्थ्यांना प्रतिनिधिक स्वरूपात प्रमाणपत्रांचे वितरण करण्यात आले. यामध्ये निराधार व दिव्यांग महिलांना सामाजिक अर्थसहाय्य योजनांचा लाभ देण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांना आवश्यक असलेली जात व उत्पन्न प्रमाणपत्रे, मोहिमेअंतर्गत फ रफार नक्कल व दुरुस्त सातबारा उतारे वितरित करण्यात आले. आरोग्य विभागामार्फत नागरिकांची प्राथमिक आरोग्य तपासणी करण्यात आली, तर विविध योजनांसाठी इच्छुक नागरिकांकडून अर्जही स्वीकारण्यात आले. झरीसह साडेगाव, वाडीदमई, संबर, मटकराळा आदी गावांतील




संख्येने उपस्थित राहून विविध या शिबिरामुळे ग्रामीण शासकीय सेवांचा समाधान व्यक्त करण्यात

# अक्षयं भवति भारत सर्वमेव....

## प्रासंगिक

डॉ. भालचंद्र हरदास

**अस्यां तिथौ क्षयमुर्पति हुतं न दत्तं।**
**तेनाक्षयेति कथिता मुनिभिस्तृतीया॥**
**उद्दिष्य दैवतपितृन्क्रियते मनुष्यैः।**
**तत् च अक्षयं भवति भारत सर्वमेव॥**

श्रीकृष्ण म्हणतात हे युधिष्ठिरा, या तिथीस केलेले दान आणि हवन क्षयाला जात नाही; म्हणून हिला मुनींनी 'अक्षय्य तृतीया' असे म्हटले आहे. देव आणि पितर यांना उद्देशून या तिथीस जे कर्म केले जाते, ते सर्व अक्षय्य -अविनाशी होते.

अक्षय्य तृतीया हिंदू संस्कृतीतील विशेष उत्सव आहे. हिंदू पंचांगानुसार वैशाख मासातील शुक्ल पक्षातील तिसऱ्या दिवशी अक्षय्य तृतीया तिथी येते. या सणाला आखा तीज, आखाजी, अख्खा तीज या नावानेही अनेक प्रांतात संबोधले जाते. समस्त भारतवर्षात मोठ्या श्रद्धेने आणि उत्साहाने अक्षय्य तृतीया साजरी केली जाते. अक्षय्य तृतीयेला अनेक पौराणिक आणि ऐतिहसिक घटना जोडल्या गेल्या असल्याने या सणाचे विशेष महत्त्व आहे. याच दिवशी भगवान विष्णूंचे सहावे अवतार भगवान परशुराम यांचा जन्मदिवस असतो. ब्रह्मदेवाचा पुत्र अक्षय याचे प्राकट्य याच दिवशी झाल्याने अक्षय तिथी म्हणून हा दिवस प्रसिद्ध पावला.

हिंदू दिनदर्शिकेप्रमाणे वर्षभरात साडेतीन शुभ मुहूर्त असतात. चैत्र शुद्ध प्रतिपदा म्हणजे गुढीपाडवा, वैशाख शुद्ध तृतीया म्हणजेच अक्षय्य तृतीया , आश्विन शुक्ल दशमी म्हणजेच विजयादशमी (दसरा) हे तीन पूर्ण मुहूर्त असून दिवाळीचा पाडवा कार्तिक शुद्ध प्रतिपदा हा अर्धा मुहूर्त आहे. कोणत्याही शुभ कार्याचा, नवीन कार्याचा प्रारंभ या दिवशी करतात. अक्षय्य तृतीया साडेतीन मुहूर्तातील अभिजित मुहूर्त असल्यामुळे या दिवशी इतर दिवसांप्रमाणे कोणतेही शुभ काम प्रारंभ करण्यास पंचांग बघण्याची गरज नाही. पौराणिक मान्यतेनुसार अक्षय्य तृतीयेला केलेल्या पुण्यकर्माचे फळ हे अक्षय असते. या दिवशी केलेले होम, हवन, जप जाप्य आदि साधना या संपूर्ण फलप्राप्ती देणाऱ्या असतात. म्हणूनच विवाह , उपनयन, गृहप्रवेश, वस्त्रआभूषण, वाहन खरेदीसाठी अक्षय्य तृतीया शुभ मानतात.

एका पौराणिक मान्यतेनुसार महाभारत काळात जेव्हा पांडव वनवासात होते तेव्हा योगेश्वर श्रीकृष्णांनी पांडवांना एक अक्षयपात्र त्यांना सप्रेम भेट दिले. या अक्षयपात्रामुळेच पांडवांना कधीही भोजन आदींची चिंता झाली नाही. श्रीकृष्ण आणि सुदामा यांच्या मित्रप्रेमाच्या कथेलादेखील अक्षय्य तृतीयेचा संदर्भ आहे. त्याचे झाले असे की आपल्या परिवाराच्या आर्थिक विवंचनेमुळे सुदामा अक्षय्य तृतीयेच्या दिवशी आपला परममित्र योगेश्वर श्रीकृष्णाकडे गेला. भेट झाल्यानंतर सुदाम्याने आपल्या शिदोरीत आणलेले मूठभर पोहे श्रीकृष्णाला दिले जे मोठ्या आनंदाने गोपाळकृष्णानी खाल्ले. यानंतर श्रीकृष्णाने आपला बालमित्र सुदाम्याचे आगतस्वागत मोठ्या अमीर उमरावाप्रमाणे केले. मात्र या सगळ्या गडबडीत सुदामा आपली पारिवारिक विवंचना सांगण्यास विसरून गेला आणि काहीही न बोलताच तसाच घराकडे यायला परत निघाला. घरी येऊन पाहतो ते नवलच! आपल्या झोपडीच्या जागेवर एक आकर्षक राजमहाल आणि दारात सुदाम्याची पत्नी आणि मुले उंची वस्त्र प्रावरणे घालून स्वागताला हजर! सुदाम्याने लगेच ओळखले की योगेश्वराने मूठभर पोह्यांच्या परतफेडीसाठी हे सगळे केले आहे. याच कारणाने धन-संपत्ती लाभासाठी अक्षय्य तृतीयेचे अनन्यसाधारण महत्त्व आहे.

सुर्जी अंजनगाव येथील परब्रह्म महारुद्र सद्‌गुरू श्रीदेवनाथ महाराज यांच्या लीलाचरित्रात देखील अशाच प्रकारची घटना आपल्याला पाहावयास मिळते. एकदा गुर्जर प्रांतात गुजरात श्रीदेवनाथ महाराज यांचा प्रवास होता. त्यावेळी दर शनिवारी दत्तप्रासादिक परंपरेप्रमाणे भिक्षाटन करायचे असा देवनाथ महाराजांचा शिरस्ता होता. परंतु गुर्जर प्रांतातील राजाने साधू, फकीर, बैरागी यांच्या भिक्षेवर बंदी आणली होती. आता कसे करावे? म्हणून गाऱ्हाणे मांडायला गुर्जर प्रांतातील गणेश मंदिरात श्रीदेवनाथ महाराज गेले. सगळी परिस्थिती श्रीगणेशाला सांगितली आणि देव, देश, धर्मासाठी कार्य करणाऱ्या साधू संतांना तुझ्या राज्यात भिक्षा मिळत नसेल तर काय करायचे असे विचारले. पण एक नाही की दोन नाही गणेशमूर्ती बोलत नाही असे पाहून शीघ्रकवी सद्‌गुरू श्रीदेवनाथ महाराजांनी कमरेला म्यान असलेली तलवार गणेशावर उचलणार तोच गणेशमूर्ती तो वार चुकवण्यासाठी सर्रकन मागे सरकली आणि देवनाथांच्या झोळीत श्रीगणेशाने अक्षय मोदक टाकला.

**यापरी गणेशासी कथित यातना**
**श्रीगणेशा मान्य हो नाथप्रार्थना**
**प्रसन्नपणी देई नाथ रमणा**
**अक्षयमोदक दानासी**

समर्थ सद्‌गुरू श्रीमनोहरनाथ महाराज विरचित श्रीदेवनाथ लीलालहरी पारायण ग्रंथातील चौदाव्या तरंगात हा कथाभाग विस्तृतपणे आला आहे. याच मोदकामुळे श्रीनाथ महाराजांची झोळी अक्षय झाली. ही दत्तप्रासादिक अक्षयझोळी आजही सुर्जी अंजनगाव येथील श्रीनाथ पीठात विद्यमान आहे. पुढे सद्‌गुरू श्रीदेवनाथ महाराज यांच्या कृपाशीर्वादाने गुर्जर राजाने भिक्षा निर्बंध मागे घेतला.

अक्षय्य तृतीयेला दक्षिण भारतात युगादी तिथी संबोधतात. या दिवशी त्रेतायुगाचा प्रारंभ झाल्याचे मानतात. नर नारायण अवतारकथा अक्षय्य तृतीयेलाच घडली. बद्रीनाथ धाम येथील नर नारायण तपस्येमुळेच पुढे अर्जुन आणि श्रीकृष्ण यांचा अवतार झाला. महाभारताचे समापन आणि पांडवांना हस्तिनापूर साम्राज्य प्राप्ती आणि शिवशंकरांच्या जटेमध्ये निवास करणाऱ्या भगवती गंगेचे गंगावतरण याच दिवशी झाले. मान्यतेनुसार बद्रीनाथपासून तीन किलोमीटर दूर असलेल्या माना येथील गणेश गुहेत महर्षी वेदव्यास यांनी श्रीगणेशाला महाभारत कथा सांगून ते महाकाव्य लेखन अक्षय्य तृतीयेलाच प्रारंभ केले.

पितरांचे स्मरण आणि तर्पण अक्षय्य तृतीयेलाच करतात. यावेळी थंड पाण्याने भरलेला मातीचा घट (कुंभ किंवा माठ) वाळा टाकून दान देण्याची पद्धत आहे. धर्मसिंधुसार हा उदककुंभ प्रदान करताना खालील मंत्रोच्चार करावा-

**एष धर्मघटो दत्तो ब्रह्मविष्णुशिवात्मकः।**
**अस्य प्रदानात् तृप्यन्तु पितरोऽपि पितामहाः॥**
**गन्धोदकतिलैर्मिश्रं सान्नं कुम्भं फलान्वितम्।**
**पितृभ्यः सम्प्रदास्यामि अक्षय्यमुपतिष्ठतु॥**

ब्रह्मा, विष्णू आणि शिव ज्यात सामावले आहेत असा हा धर्मघट मी ब्राह्मणाला दान केला आहे. या दानामुळे माझे पितर आणि देवता तृप्त होवोत. गंध, उदक, तिळ आणि फळे यांनी युक्त असा हा कुंभ मी पितरांसाठी देत आहे. हा कुंभ माझ्यासाठी सदा अक्षय्य (क्षय न पावणारा) ठरो.

गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर नांगरलेल्या शेतजमिनीची मशागत अक्षय्य तृतीयेपर्यंत करून अक्षय्य तृतीयेला मातीचे आळे करून त्यात बीजारोपण करावे. यादृष्टीने पाहिल्यास अक्षय्य तृतीया हा आपल्या ऋषी आणि कृषी संस्कृतीचा संगम आहे.

हवामान आणि पीकपाण्याच्या अंदाजाच्या पद्धतीप्रमाणेच वऱ्हाडात यासाठी भेंडवळच्या घटमांडणीची पद्धत रूढ आहे. ही घटमांडणी ३५० वर्षांहून अधिक जुनी परंपरा आहे. अक्षय्य तृतीयेच्या शुभमुहूर्तावर बुलढाणा जिल्ह्यातील पूर्णा नदीच्या काठी वसलेल्या भेंडवळ गावात होणारी घटमांडणी शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणाऱ्या पर्जन्यमान आणि पिकांच्या स्थितीवर अंदाज वर्तविते. तेव्हाच्या चंद्रभान महाराजांचा वसा त्यांच्या वंशजांनी आजही टिकवून ठेवला आहे. घटमांडणीनंतर वर्तवलेली गेलेली पीकपाणी, राजकीय आणि आर्थिक भाकिते बऱ्याचदा खरी ठरली आहेत. निव्वळ ठोकताळे असले तरी वऱ्हाडातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने आजही भेंडवळचे महत्त्व कमी झालेले नाही. अक्षय्य तृतीयेला या गावात विदर्भ, खान्देशसह अनेक भागांतून शेतकरी मुक्कामाला येऊन दुसऱ्या दिवशीच्या पहाटेची वाट पाहतात. अक्षय्य तृतीयेच्या दिवशी राजाने किंवा प्रजेच्या पालनपोषणाची जबाबदारी असणाऱ्यांनी सामूहिकरीत्या राजवाड्यात किंवा सामूहिक पूजाविधीच्या ठिकाणी श्रीविष्णुसहित वैभवलक्ष्मीच्या प्रतिमेचे कृतज्ञतेचा भाव ठेवून भक्तिभावाने पूजन करावे. यामुळे प्रजा सुखी व समृद्ध होते. लक्ष्मीदेवीची कृपाच आपल्यावर होत नाही; कारण लक्ष्मीदेवी ही श्रीविष्णूची शक्ती आहे. जेथे श्रीविष्णूलाच बोलावणे नाही, तर त्याच्यासोबत किंवा त्याच्यात असणारी त्याची शक्ती कशी बरे पूजास्थळी येऊन कृपा करेल ? म्हणून कोणत्याही रूपातील श्रीलक्ष्मी पूजनाच्या वेळी श्रीविष्णूला प्रथम आवाहन करावे व नंतर श्रीलक्ष्मीलाही आवाहन करावे. त्यामुळे उपासकाला लक्ष्मीतत्त्वाचा जास्तीत जास्त लाभ होतो.

अक्षय्य तृतीयेलाच खान्देशात आखाजी म्हणून संबोधतात. जळगाव, धुळे, नंदुरबार आणि नाशिक जिल्ह्याचा काही भागांत प्रामुख्याने अहिराणी बोली भाषा आहे. या अहिराणीत आखाजीविषयी अनेक गीते आहेत. या गीतातून खान्देशातील संस्कृती, जनजनीवन, कुटुंबव्यवस्था, सासर-माहेर, नातेसंबंध यांचे असंख्य पदर उलगडून जातात. सासूरवाशिणीला माहेरचा अक्षय्य आनंद देणारी म्हणून अक्षय्य तृतीया ओळखली जाते. कवयित्री बहिणाबाई चौधरी यांनी शब्दबद्ध केलेल्या अनेक कविता आजही आखाजी सणानिमित्त गायिल्या जातात.

**आखाजीचा आखाजीचा**
**मोलाचा सन देखा जी**
**निंबावरी निंबावरी**
**बांधला छान झोका जी।**
**माझा झोका माझा झोका**
**चालला माहेराले जी**
**आला झोका आला झोका**
**पलट सासराले जी**

आखाजीनिमित्त माहेरवाशिणी झिम्मा, फुगडी, सारीपाट, उखाणे, झोपाळे यांचा मनमुराद आनंद लुटतात.

भारतीय संस्कृतीमधील पारिवारिक भावनेचे प्रातिनिधिक स्वरूप म्हणजे अक्षय्य तृतीया म्हणता येईल. शरीर आणि संसारातील सर्वच वस्तू या नाशिवंत आहेत. अक्षय -अविनाशी केवळ परमात्मा आहे. अक्षय्य तृतीया हा दिवस आत्मप्रेरणा घेण्याचा मंगल दिवस आहे. अक्षय आत्मतत्त्वावर दृष्टी असतानाच देव, देश, धर्मावर अनन्य श्रद्धा ठेवून विश्वमंगल भारताचे स्वप्न याचि देही याचि डोळा बघावयास मिळो हीच अक्षय्य तृतीयेच्या मंगलपर्वावर शुभकामना. चला तर सर्वांनी मंत्रघोष करूया, अक्षयं भवति भारत सर्वमेव...

९६५७७२०२४२

(लेखक भारतीय शिक्षण मंडळाचे नागपूर महानगर मंत्री आहेत.)

## आदरांजली

# स्वरतारकेचा निरोप

सावनी शेंडे

**आपल्या सुरेल आवाजाने भारतीय संगीतविश्वाला श्रीमंत करणाऱ्या आशा भोसलेंचे नाव घेतले की मन आपोआपच सुरांनी भारून जाते. त्यांच्या आवाजात भावना, उत्साह, खट्याळपणा आणि कोमलता यांचे सुंदर मिश्रण होते. त्यांच्या सुरांनी अनेक पिढ्यांच्या भावनांना शब्द दिले. शब्दांना अर्थ दिला आणि गाणे म्हणजे केवळ सूर नव्हे, तर जगण्याचा उत्सव असतो, हे आपल्या प्रत्येक गाण्यातून सिद्ध केले. त्यांना वाहिलेली ही आदरांजली.**

स्वरमंडळातून आशा भोसले नावाचा एक तारा निखळला. खरे तर, अशी थोर व्यक्ती आपल्यातून निघून गेल्यानंतर मोठी पोकळी निर्माण होते, असे म्हटले जाते. आशाबाईंच्या जाण्यामुळे केवळ संगीत क्षेत्रातच पोकळी निर्माण झाली आहे, असे मी म्हणणार नाही. कारण त्या संगीताच्या माध्यमातून आपल्या सर्वांशी निगडित होत्याच; पण घरातल्या ज्येष्ठ व्यक्तीप्रमाणे त्या सदैव आपल्या जवळ होत्या. त्यांच्या जाण्याने निर्माण झालेला हा रितेपणा आपल्या भावविश्वात झाला आहे. आपल्या घरात, आपल्या मनात झाला आहे. आशा भोसले यांनी एस. डी. बर्मन यांच्यापासून थेट ए. आर. रहमानपर्यंत विविध कालखंडांमधील अनेक संगीतकारांबरोबर काम केले आहे. मराठीत दत्ता डावजेकर, श्रीनिवास खळे यांच्यापासून श्रीधर फडके यांच्यापर्यंत असंख्य संगीतकारांच्या रचनांना त्यांनी सुरेल साज चढवला. मधुबाला आणि मीनाकुमारीपासून अगदी तब्बू, उर्मिला मातोंडकर, ऐश्वर्या रायपर्यंतच्या अलिकडच्या काळातील अभिनेत्रींनाही त्यांनी आपला आवाज दिला. त्यांनी मोहम्मद रफी, किशोरकुमार आणि सुधीर फडके यांच्याबरोबरचा काळ गाजवलाच, पण हृषीकेश रानडेसारख्या तरुण गायकाबरोबरही गाणी गायली. आवाजाला वय नसते. आवाज सदैव तरुण असतो, हे त्यांनी सिद्ध केले आहे. विशेष म्हणजे आपला आवाज तरुण ठेवण्यासाठी त्या सदैव रियाज करीत होत्या. त्यांनी कधीही रियाज चुकवला नाही.

आशाताई सुमारे ९०० चित्रपटांशी गायिका म्हणून जोडल्या गेल्या. त्यांनी २० भाषांमध्ये १२,००० पेक्षा जास्त गाणी गायली. अनेक भावभावनांना आपल्या सुरांनी रंग दिले आणि प्रत्येकाचे भावविश्व समृद्ध केले. शास्त्रीय, उपशास्त्रीय संगीत, मराठी भावगीते, अभंग, गझल, मराठी-हिंदी चित्रपटगीते, नाट्यगीते, गझल, लावण्या, डिस्को-रॉक-पॉप अशा सर्व प्रकारच्या संगीतामध्ये आशाताई तेवढ्याच ताकदीने गायल्या. त्यांनी चित्रपटांमधल्या कॅब्रे नृत्यांनाही आवाज दिला. खरोखरच, त्यांच्या आवाजाची लवचीकता आणि झेप खूप मोठी होती. ओ. पी. नय्यर यांच्यासोबत त्यांनी खूप सुंदर गाणी गायली. 'आँखोसे जो उतरी है दिल में' (फिर वही दिल लाया हूँ), 'आईये मेहरबान' (हावरा ब्रिज), 'ये है रेशमी जुल्फों का अंधेरा' (मेरे सनम), 'इशारों इशारों में'(कश्मीर की कली), 'जाइये आप कहां जाएंगे' (मेरे सनम), 'वो हसीन दर्द देदो' (हम साया) ही त्यांची काही खास गाणी. ओ. पी. नय्यर यांनी त्यांच्या आवाजातील खट्याळपणा आणि लयबद्धता सुंदरतेने वापरली आणि आपल्याला अनेक अजरामर गाणी मिळाली.

'तीसरी मंजिल' या चित्रपटानंतर आशाताईंनी पंचमदांसाठी गाणे सुरू केले. आर. डी. बर्मन ज्या चित्रपटांचे संगीत देत, त्या चित्रपटांमध्ये आशा भोसले यांचे गाणे नक्की असायचे. १९७० च्या दशकात दोघांनी अनेक हिट गाणी दिली. आर. डी. बर्मन यांच्यासोबतची त्यांची बहुतेक गाणी गाजली. 'दम मारो दम', 'पिया तू अब तो आजा', 'चुरा लिया है तुमने', 'मेहबूबा मेहबूबा', 'ओ मेरे सोना रे' ही गाणी आजही लोकांच्या ओठांवर आहेत. 'तुम साथ हो जब अपने', 'दम मारो दम', 'दो लफ्जों की है दिल की कहानी', 'कह दूं तुम्हें', 'सुन सुन दीदी तेरे लिए' या गाण्यांना आशा भोसले यांनी स्वरसाज चढवला आणि इतिहास घडवला. गुलाम अलींबरोबर मेहंदी हसनबरोबरदेखील आशाताईंनी गाणी गायिली आहेत.



आशा भोसले यांच्या मराठी आणि हिंदी गाण्यांचा खजिना खूप मोठा आहे. मला त्यांची 'उमराव जान' मधली सगळीच गाणी खूप आवडतात. त्यातही 'इन आँखों की मस्ती के' ही या गाण्यात त्यांच्या आवाजातील नजाकत आणि शास्त्रीय स्पर्श स्पष्ट जाणवतो. हृदयनाथ मंगेशकर यांच्यासोबतच्या त्यांच्या गाण्यांमध्ये खास वेगळेपणा होता. आशा भोसले यांनी त्यांच्या संगीत दिग्दर्शनाखाली काही अतिशय दर्जेदार आणि भावपूर्ण मराठी गाणी गायिली आहेत. 'तरुण आहे रात्र अजुनी', 'केव्हा तरी पहाटे', 'गेले द्यायचे राहून तुझे नक्षत्रांचे देणे' यांसारखी गाणी खूप गाजली. या गाण्यांमध्ये शास्त्रीय संगीताचा आधार आणि भावनांची खोली दोन्हीही जाणवते. हृदयनाथ मंगेशकर यांच्या संगीताची खासियत म्हणजे सूक्ष्म चढ-उतार आणि भावपूर्णता. आशा भोसले यांच्या आवाजाने त्या रचनांना वेगळेच सौंदर्य दिले.

वयाच्या ७४ व्या वर्षी त्यांनी ऑस्ट्रेलियन क्रिकेट खेळाडू ब्रेट ली, अभिनेता संजय दत्त यांच्याबरोबर गाण्याचा प्रयोग केला. 'आशा अँड फ्रेंड्स' या अल्बमचा हा प्रयोग कमालीचा यशस्वी ठरला. अभिजात संगीतकलेला जसे स्थळ-काळ-वेळेचे बंधन नसते, तसेच आशाताईंच्या आवाजालाही या कशाचेही बंधन नव्हते. त्यांच्या शेवटच्या काळातील गाण्यांपैकी 'कशिश' हा मला आवडणारा खास आणि भावपूर्ण अल्बम. 'कशिश' म्हणजे ओढ, आकर्षण. या अल्बममधील गाण्यांमध्ये हीच भावना सुरेख जाणवते. आशाबाईंनी अनेक सुंदर मराठी गाण्यांवर स्वरसाज चढवला. 'धुंदी कळ्यांना', 'देव जरी मज कधी भेटला', 'का रे दुरावा', 'गोमू संगतीनं', 'गोरी गोरी पान', 'जांभूळ पिकल्या झाडाखाली' यासारखी त्यांची अगणित गाणी लोकप्रिय झाली. या गाण्यांमध्ये त्यांचा आवाज कधी कोमल, कधी खट्याळ तर कधी खूप भावपूर्ण वाटतो. 'जिवलगा राहिले रे दूर घर माझे', 'ही वाट दूर जाते', 'फुलले रे क्षण माझे', 'ऋतु हिरवा', 'सांज ये गोकुळी', 'झिनी झिनी वाजे', 'गंध फुलांचा गेला सांगून', 'आज कुणीतरी यावे', 'एका तळ्यात होती' अशी त्यांनी गायिलेल्या मधुर, लोकप्रिय गीतांची यादी बरीच मोठी आहे. 'रेशमाच्या रेघांनी'मधला लावणीचा ठसका, 'सैनिक हो तुमच्यासाठी'मधला कृतज्ञता भाव, 'शूरा मी वंदिले' यातील प्रेम आणि आदर, 'जे वेड मजला लागले'ची गोडी... हे सारे आशाताईंच्या आवाजाने श्रवणीय केले.

आशाताईंनी गायला सुरुवात केली त्या काळात हिंदी चित्रपट संगीतावर लता मंगेशकर, शमशाद बेगम, गीता दत्त अशा गायिका राज्य करीत होत्या. परंतु या गायिकांच्या राज्यात राहून, गाऊन, आपले वेगळे अस्तित्व निर्माण करण्याचे, स्वतःला सिद्ध करण्याचे मोठे आव्हान आशाताईंपुढे होते. या दरम्यान त्यांच्या वैयक्तिक आयुष्यातील अडचणी, मुलांची जबाबदारी, प्रतिकूल परिस्थिती या सगळ्या विपरीत घटकांशी सामना करत करीत आशाताईंनी हे आव्हान स्वीकारले आणि ते स्वबळावर, आत्मविश्वासाने यशस्वीपणे पेलून दाखवले. लतादीदींपेक्षा वेगळ्या गायकीचा ठसा त्यांनी संगीत क्षेत्रावर उमटवण्याचा यशस्वी प्रयत्न केला. आशाताईंचे विशेष म्हणजे त्या प्रत्येक पिढीबरोबर पुढे पुढे सरकत राहिल्या. त्यामुळे त्यांचा आवाज, त्यांचे सूर आणि गायकी सदैव तरुण राहिली. त्यांनी इतक्या प्रकारची गाणी गायिली, पण त्यात कुठेही सरमिसळ झाली नाही. त्यांनी गायिलेल्या अभंगांमध्ये भावभक्तीचा गोडवा असायचा तर नाट्यसंगीताला विशिष्ट बाज असायचा. त्यांनी गायलेला कॅब्रे तितकाच दिलखेचक आणि शृंगारिक असायचा. असे अनेक कप्पे त्यांनी लीलया जपले. हे त्यांचे वैशिष्ट्य होते. थोर गायकच हे करू शकतात आणि तेही अगदी सहजपणे.

आशाताईंची प्रत्यक्ष भेट होण्याचे भाग्य मला लाभले होते. प्रसिद्ध छायाचित्रकार गौतम राजाध्यक्ष यांच्या 'चेहरे' या छायाचित्रांचे प्रदर्शन पुण्यात होते. संगीतकार आनंद मोडक आणि माझे कुटुंबीय तेव्हा तिथे उपस्थित होते. त्यावेळी आशाबाईंनी मला आशीर्वाद दिला होता. ती आठवण माझ्याजवळ सदैव आहे आणि तीच माझी शक्ती आणि स्फूर्ती आहे. त्यामुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षपणे त्या आपल्या जवळ आहेत, असे मला वाटते. आशाताईंना अगणित पुरस्कार मिळाले. पद्मविभूषण, पद्मश्री देऊन भारत सरकारने त्यांचा सत्कार केला. गिनीज बुकमध्ये त्यांचे नाव समाविष्ट केले गेले. परंतु त्या सगळ्या पुरस्कारांपेक्षाही जास्त त्यांनी आपले जग समृद्ध केले आहे. म्हणूनच आशाताई शरीररूपाने आपल्यातून गेल्या असल्या तरी स्वरांमधून, गीतांमधून आणि विविध प्रकारच्या संगीतातून त्या आपल्यात चिरंतन रूपात आहेत. कारण आयुष्यातल्या प्रत्येक क्षणी आपल्या मनात एखादा भाव उमटेल, एखादी हळुवार भावना स्पर्श करेल, तेव्हा आशाताईंचे सूर आपल्याला अलगद वेढून घेतील आणि हळूच सांगतील, 'मी आहे'.

## रविवारची पत्रे

### नागपुरातील महिलांची शेगाव पायीवारी

रात्रीचा अंधार नाहीसा होऊन आकाशी सूर्यनारायण उगवले. प्रत्येकाच्या हृदयमंदिरात गजानन महाराज अंश प्रकट होऊनी वारीसाठी सारे वारकरी प्रतापनगर येथील गणेश मंदिरात सज्ज झाले. श्री गजानन महाराज यांच्या हयातीतले रामचंद्र पाटील यांची पणती प्रज्ञा पन्नासे यांनी वारीच्या दोन्ही वाहनांची विधिवत पूजा केली. गजानन देशपांडे, डॉ. मनीषा यमसनवार आदींनी स्वागत केले. प्रवासादरम्यान भजनाच्या रंगात रंगून गेले सारे भक्त. एकमेकांचा परिचय झाला. वाटेत मोझरी इथे संत तुकडोजी महाराज यांच्या मूर्तीचे दर्शन घेतले. तिथून भजनाच्या नादात अकोला कधी पोहोचलो हे कळलेच नाही. अकोल्यावरून दोन किलोमीटर गायगाव येथे नानासाहेब



उजवणे यांच्या मंगल कार्यालयात भोजनास्वाद घेतला. नानासाहेब उजवणे आणि त्यांची सहचारिणी यांचा गजानन महाराजांवरचा दृढविश्वास जाणून घ्यायला मिळाला. घरासमोरून जाणाऱ्या वारकऱ्यांना महाराजांच्या कृपेने स्वादिष्ट जेवण ते देतात. आम्ही इथून पालखी सजवून नागझरी वाटेने निघताना अकोला येथील माजी महापौर हरीशभाई आलमचंदानी यांनी सपत्नीक पालखीची पूजा केली व पालखीसह पायीवारी नागझरीकडे प्रस्थान झाली. वाटेत गजानन महाराज पारायण सेवा समितीचे वतीने नारळ पाणी, ग्लुकोज पाणी, मसाले भात यांची थोड्या थोड्या अंतरावर सोय केली होती. रात्री अडीच वाजता नागझरीला पोहोचलो. सुप्रभाती ६ ला पालखी दिंडीसह शेगावात सकाळी ९ वाजता पोहोचलो. शेगाव संस्थेने पालखीची पूजा आरती केली. त्यानंतर 'श्रीं'चे दर्शन घेऊन चतुर्थीचा पोटभर प्रसादरूपी नाश्ता करून घेतला. पहिल्यांदाच पायीवारी असून काहीच जाणवले नाही, ही साक्षात गजाननाचीच कृपा; या कृपेचे आम्ही सारे वारकरी भाग्यवान ठरलो.

**शैला चिमड्यालवार**/सावली/९४०५१५९३४०

### होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा : प्रश्न स्त्री सन्मानाचा

'यत्र नार्यस्तु पूज्यन्ते, रमन्ते तत्र देवता' हा आपल्या भारतीय संस्कृतीचा मूलमंत्र आहे. आपल्या परंपरेत स्त्रीला केवळ एक व्यक्ती म्हणून नव्हे, तर शक्ती, संस्कार आणि सृजनाची अधिष्ठात्री म्हणून पाहिले गेले आहे. स्त्री ही कुटुंबाची आधारस्तंभ, समाज घडवणारी शक्ती आणि राष्ट्राच्या प्रगतीची केंद्रबिंदू आहे. त्यामुळेच स्त्रीचा सन्मान राखणे हे केवळ कर्तव्य नसून संस्कृतीचे रक्षण आहे. मात्र, सध्या विविध सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक आणि राजकीय कार्यक्रमांमध्ये 'होम मिनिस्टर-खेळ पैठणीचा' या नावाखाली सादर होणाऱ्या कार्यक्रमांनी चिंतेची परिस्थिती निर्माण केली आहे. सुरुवातीला मनोरंजनाच्या उद्देशाने सुरू झालेला हा उपक्रम कालांतराने आपल्या मूळ उद्देशापासून दूर गेला. आज या कार्यक्रमांमध्ये महिलांची चेष्टा करणे, त्यांची खिल्ली उडवणे, वैयक्तिक आणि कौटुंबिक आयुष्याशी संबंधित प्रश्न विचारून त्यांना अवघड स्थितीत टाकणे, अश्लील किंवा अयोग्य हावभाव करायला लावणे, चुकीचे अंगविक्षेप करायला भाग पाडणे तसेच तुच्छतेची वागणूक देणे असे प्रकार वाढलेले दिसतात. मनोरंजनाच्या नावाखाली होणारे हे प्रकार प्रत्यक्षात स्त्रीच्या सन्मानाला धक्का देणारे आहेत. एका बाजूला एखाद्या विजेत्या महिलेला पैठणी किंवा इतर बक्षीस दिले जाते; पण दुसऱ्या बाजूला सहभागी झालेल्या अनेक महिलांचा सार्वजनिकरीत्या अपमान होतो. यामुळे त्यांच्या आत्मसन्मानावर परिणाम होतो, आत्मविश्वास कमी होतो आणि मानसिक खच्चीकरण होते. याचे दुष्परिणाम केवळ त्या महिलांपुरते मर्यादित राहत नाहीत. अशा कार्यक्रमांचा प्रभाव लहान मुलांवरही पडतो. त्यांच्या मनावर चुकीचे संस्कार होतात आणि स्त्रीकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकृत होण्याची शक्यता निर्माण होते. महिलांमध्ये एकमेकींबद्दल ईर्ष्या, स्पर्धा आणि द्वेष वाढीस लागतो, ज्यामुळे कौटुंबिक आणि सामाजिक वातावरण दूषित होते. भारतीय संस्कृती आपल्याला शिकवते 'स्त्री ही पूजनीय आहे, विनोदाची वस्तू नाही.' म्हणूनच स्त्रीच्या सन्मानाला धक्का पोहोचवणाऱ्या कोणत्याही प्रकाराला समाजाने ठामपणे विरोध करणे आवश्यक आहे. स्त्रीचा अपमान म्हणजे समाजाच्या मूल्यांचा अपमान होय. जिथे स्त्रीचा सन्मान नाही, तिथे समाजाची अधोगती निश्चित आहे. गरज आहे ती समाजात जागृती निर्माण करण्याची. महिलांचे मानसिक आणि सामाजिक आरोग्याचे रक्षण मिनिस्टर' नसून ती समाजाची संस्कृती, कुटुंबाची ओळख आणि राष्ट्राची शक्ती आहे. तिचा सन्मान राखणे म्हणजे आपल्या संस्कृतीचे रक्षण करणे होय. म्हणूनच समाजातील सर्व घटकांनी एकत्र येऊन स्त्री सन्मानासाठी आवाज उठवावा, अशा कार्यक्रमांना विरोध करावा आणि सन्मानपूर्वक, संवेदनशील व संस्कारित समाज घडविण्यासाठी पुढाकार घ्यावा.

**नलिनी वायाळ गावडे**/पुणे/८८८८९८७६७६

### पावले ही फुलांची उपक्रमात 'ताम्हण'चा जागर!

महाराष्ट्र राज्याची उपराजधानी नागपूर शहर, गेल्या दशकांपासून विविध नैसर्गिक फुलांनी बहरलेले शहर म्हणून ओळखले जात आहे. नागपूर तरुण भारत शताब्दी वर्षाच्या पर्वावर पावले ही फुलांची हा स्तुत्य उपक्रम हाती घेण्यात आला. या उपक्रमात ताम्हण या राज्य फुलाचा उत्सव साजरा करण्यात आला. १९९० च्या सुमारास महाराष्ट्र सरकारने ताम्हण फुलाला राज्यफूल म्हणून घोषित केले आहे. याला मोठा बोंडारा, हिंदीत जारुल, अर्जुन तर इंग्रजीत प्राईड ऑफ इंडिया या नावाने सुद्धा ओळखले जाते. मध्यम उंचीचा लांब गर्द पाने व जांभळ्या व तांबड्या रंगाच्या फुलांनी बहरलेले सौंदर्य वैशाखाच्या रणरणत्या उन्हात आपले वेगळेपण जपते. पश्चिम महाराष्ट्राच्या पानगळींच्या जंगलात, कोकणात नदी-नद्यांच्या काठाने आणि विदर्भ मराठवाड्यात सर्वत्र आढळणारा ताम्हण वृक्ष सर्वांच्या सुपरिचित आहे. इतर राज्यात कमी अधिक प्रमाणात आढळल्या जाणारा ताम्हण वृक्ष शेजारील देशात सुद्धा आढळून येत असल्याचे वृक्ष अभ्यासकांचे मत आहे.

ताम्हण वृक्षाच्या संदर्भात सांगायचे झाल्यास, याची साल पिवळसर, करड्या रंगाची आणि गुळगुळीत असते. पाने साधी लंबगोल आकाराची, वरच्या बाजूने गडद हिरवी, तर खालच्या बाजूने फिकट हिरवी असतात. हिवाळ्यात पानगळ होताना पानांचा रंग तांबडा होतो. तर वसंत ऋतूची चाहूल लागताच तिला नवं पालवी फुटण्यास प्रारंभ होतो. नवं पालवीच्या पश्चात वृक्ष कळ्या फुलांनी बहरण्यास प्रारंभ होते. जांभळ्या व तांबड्या रंगाचे अत्यंत देखणे फुल रणरणत्या उन्हात मनाला मोहित करते. ताम्हण पुष्प पूर्ण उमलल्यानंतर सहा ते सात सेंटीमीटर व्यासाचे होते. सप्त नाजूक पाकळ्यांचे फूल त्याची रंगसंगती ही अप्रतिम असते. फुलांच्या मध्यभागी पिवळे नाजूक पुंकेसर विलक्षण सौंदर्यात भर घालते. झाडाला पाण्याची मुबलकता असल्यास, वर्षात दोन वेळा झाड फुलांनी बहरते. मार्च, एप्रिलमध्ये बहरलेले झाड दोन महिने फुलांनी सजलेले आढळून येते. केवळ निसर्ग सौंदर्यातच ताम्हणभर घालीत नाही तर, ताम्हणवृक्षाचे आयुर्वेद, पर्यावरणीय, सांस्कृतिक, पौराणिक महाराष्ट्र विविध वारसा व परंपरेने नटला आहे. त्यात पर्यावरणीय संतुलन, जैव विविधता राखण्यास ताम्हण वृक्षाचा मोठा वाटा आहे. ताम्हण सांस्कृतिक परंपरा समृद्ध करून, धार्मिक विधींमध्येही ताम्हण फुलाचे महत्त्व अबाधित राहिलेलं आहे. याच्या संवर्धनासाठी शासन स्तरावर व्यापक प्रयत्नही होणे गरजेचे आहे.

**शशिकांत तोटे**/९१३०८३५४५८

### माहिती तंत्रज्ञान युगातील युवा पिढी

आजचे जग हे उत्तम रोबोटिक्स यासारख्या प्रगत तंत्रज्ञानामुळे जवळ आले आहे. या तंत्रज्ञानाचा उपयोग योग्य प्रकारे केल्यास युवा पिढीसाठी मोठी संधी निर्माण होईल. तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रात क्रांती घडली आहे. ऑनलाईन शिक्षण व्हर्च्युअल क्लासरूम आणि इबुक्समुळे विद्यार्थ्यांना कुठेही कधीही शिक्षण शक्य झाले आहे. युवा पिढीला विविध



विषयांमध्ये गती मिळविण्यासाठी इंटरनेट मोठा आधार ठरत आहे. अनेक तरुण नवीन स्टार्टअप्स सुरू करत आहेत, ज्यामध्ये तंत्रज्ञानाची महत्त्वपूर्ण भूमिका आहे.

सोशल मीडियाचा उपयोग करून तरुणांना आपल्या कल्पना करा आणि व्यवसाय जगासमोर सादर करता येतात. डिजिटल मार्केटिंग वेब डिझाईन आणि ॲप डेव्हलपमेंटसारख्या क्षेत्रात आजची युवा पिढी अधिक सक्रिय आहे. तंत्रज्ञानामुळे युवा पिढीला रोजगाराच्या अनंत संधी उपलब्ध झाल्या आहेत. तथापि तंत्रज्ञानाच्या अतिरेकी वापरामुळे काही नकारात्मक परिणाम देखील होत आहेत. सोशल मीडियाचा अतिरेक ऑनलाईन गेमिंगची नशा आणि माहितीचा गैरवापर यामुळे युवापिढीचा वेळ वाया जातो. त्याचबरोबर डिजिटल साधनांच्या अति वापरामुळे मानसिक आणि शारीरिक आरोग्यावरही परिणाम होतो.

तंत्रज्ञानाचा योग्य वापर करण्यासाठी योग्य मार्गदर्शनाची गरज आहे. युवा पिढीने तंत्रज्ञानाचा उपयोग केवळ तंत्रज्ञानाच्या योग्य वापरामुळे युवा पिढी जगभरातील स्पर्धेमध्ये आघाडीवर राहू शकते. परंतु या प्रगत साधनांचा विवेकपूर्ण आणि मर्यादित वापर करणे महत्त्वाचे आहे. युवा पिढीने तंत्रज्ञानाचा उपयोग करताना मूल्यसंस्कार आणि नीतिमत्ता याचा विसर पडू देऊ नये. तंत्रज्ञान हे भविष्य घडवणारे साधन आहे परंतु त्याचा अतिरेक हा हानिकारक ठरू शकतो व योग्य दृष्टिकोन आणि सर्तकतेने तंत्रज्ञानाचा उपयोग केल्यास युवा पिढी समाजाच्या विकासाला नवी दिशा देऊ शकते.

**सोहम प्रशांत पेंडसे**/९०२८६७५५१८

### अंधश्रद्धा नसावी

सुशिक्षित नागरिक विशेषतः महिला बुवाबाजीकडे मोठ्या प्रमाणात आकृष्ट होताना दिसतात. याचे प्रमुख कारण आहे सहनशक्तीचा अभाव, मिळते त्यात समाधानी नसणे, दुसऱ्यावर विश्वास ठेवणे. चार लोक एकत्र करून स्वार्थापोटी त्यांचे माध्यमातून प्रचार, प्रसार करणे हा गोरखधंदा तथाकथित बुवाबाजी करणारे करतात. त्याला जीवनात समाधानी नसलेले लोक हकनाक बळी पडताना दिसतात. अशी माणसं जागी होतात ते सर्वस्व लुटल्यानंतरच.

नाशिकचे अशोक खरात प्रकरण त्यातलेच. जे त्यांच्या आहारी गेलेत ते सर्व सुशिक्षित आहेत. महाराष्ट्र महिला आयोगाच्या माजी अध्यक्षां सारखी सुशिक्षित महिला जर अशा भोंदूंच्या आहारी जात असेल तर इतरांचे काय? रूपाली चाकणकर यांचा परिवार पण सुशिक्षित आहे. मुलगी वकील आहे तर मुलगा एमबीए करतो आहे. अशा सुखी, समाधानी, परिवाराला अशी दुर्बुद्धी का व्हावी हे न उलगडणारे कोडे आहे.

प्रसार माध्यमांनी खरात प्रकरण चांगलेच गाजवले. पण त्याला आता फार उशीर झाला. या भोंदूला शिक्षा होईलही पण ज्या महिलांचे आयुष्य उद्ध्वस्त झाले त्याचे काय? आता तर काही खासदार, आमदार, मंत्री, प्रशासकीय अधिकारी यांची नावे या प्रकरणाशी जोडली जात आहे. आता या विषयाकडे राजकीय चष्म्यातून बघितले जात आहे. याचा परिणाम चौकशी यंत्रणेवर होऊ शकतो. सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्यांचा विशेषतः समाजातील विशेष गणमान्य व्यक्तींचा खरातसारख्या व्यक्तीशी कळत नकळत संबंध येऊ शकतो. खरातचे खरे रूप समाजासमोर आल्यानंतर पोलिस यंत्रणा, प्रसार माध्यमे जागृत झालीत पण या व्यक्तीला मोठे कुणी केले? याला अंधश्रद्धा म्हणायची की व्यक्तिगत स्वार्थ, असमाधानी वृत्ती.

आयुष्य अतिशय सुंदर आहे.आपले भविष्य आपल्याच हातात आहे. सुंदर आयुष्य जगायचे असेल तर बुवाबाजीकडे वळण्याची आवश्यकता नाही. स्वतःवर विश्वास असावा. कर्म करीत रहावे. यश-अपयशाची चिंता न करता. खरात प्रकरणातून एवढा धडा जरी आपण घेतला तर असे भोंदू भविष्यात जन्माला येणार नाहीत.

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८४७२६८
RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

## केज येथे विजय स्पोर्ट्स क्रीडा अकॅडमीचे वतीने उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन



**केज/प्रतिनिधी** | केज शहर व तालुक्यातील खेळाडूंसाठी विजय स्पोर्ड्स अकॅडमीच्या वतीने विविध खेळांच्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आल्याची माहिती अकॅडमीचे संचालक विनोद गुंड यांनी दिली आहे. विजय स्पोर्ड्स अकॅडमीच्या वतीने १ मे2026 ते १ जून 2026 या दरम्यान एक महिन्याचे फुटबॉल, व्हॉलीबॉल, क्रिकेट, योगा, बुद्धीबळ, खेळाचे उन्हाळी क्रीडा प्रशिक्षण आयोजन केले आहे. या शिबिरामध्ये शास्त्रशुध्द पध्दतीने क्रीडा प्रशिक्षण दिले जाणार असून या शिबिरात १४ वर्षाखालील मुला - मुलींना प्रवेश दिला जाणार आहे. हे शिबिर स्वामी विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या मैदानावर सकाळी ६ ते ८ या वेळेत होणार आहे. या शिबिरात केज तालुक्यातील खेळाडूनी सहभाग व्हावे. असे आवाहन करण्यात आले आहे.

## भैरवनाथ नगरातील शिवमहापुराण कथेचा आज समारोप

**बीड/प्रतिनिधी**| बहिरवाडी परिसरातील भैरवनाथ नगर येथे श्री भैरवनाथ चैत्र अष्टमी उत्सवानिमित्त आयोजित शिवपुराण कथेचा आज सोमवार दि. 20 एप्रिल रोजी काल्याच्या कीर्तनाने समारोप होणार असून याप्रसंगी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन आयोजकांनी केले आहे. भैरवनाथ नगर येथे श्री भैरवनाथ चैत्र अष्टमी उत्सवानिमित्त जळगाव जिल्ह्यातील भुसावळ येथील आंतरराष्ट्रीय कथा प्रवक्ते, बालकथा सेवक, गोवत्सल ह. भ. प. प.पू. शिरीष महाराज बारी (व्यास) यांच्या शिवमहापुराण कथेचे आयोजन सोमवार दि. 13 एप्रिल 2026 पासून करण्यात आले होते. या शिवमरापुराण कथेचा समारोप धारूर तालुक्यातील सोनी मोहा येथील ह. भ प. प्रकाश महाराज साठे यांच्या काल्याचे किर्तनाने सोमवार दि. 20 एप्रिल 2026 रोजी सकाळी दहा ते बारा या वेळेत होणार आहे. दि. 13 एप्रिल पासून सायंकाळी सात ते दहा या वेळेत सुरू असलेल्या या शिवमहापुराण कथेच्या संचामध्ये अरुण महाराज (व्हिडिओग्राफर, हिंगोली), भागवत महाराज घुगे (आर्गन वादक, पुणे), रोशन महाराज (तबला व ढोलक वादक), मुकेश महाराज (गवाई बँजो वादक, पुणे), भागवत बाबुळगावकर (गायनाचार्य) शिवा महाराज गिरी (पॅड वादक, शेगाव संस्थान) यांचा समावेश होता. कीर्तनाची साथसंगत महाराष्ट्रातील ख्यातनाम मृदंगाचार्य ह. भ. प. कृष्णाजी महाराज बोरखडे, गायनाचार्य ह. भ. प. ओंकार महाराज जगताप, गायनाचार्य ह. भ. प. कैलास महाराज पवार, गायनाचार्य ह. भ. प. अभिमान महाराज ढाकणे, गायनाचार्य ह. भ. प. सुग्रीव महाराज डाके यांनी दिली.

## तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईनमध्ये 'नारी शक्ती कौशल्य अभियान' संपन्न

बीड (प्रतिनिधी) - देवगिरी प्रतिष्ठान संचलित, तुलसी कॉलेज ऑफ फॅशन डिझाईन, बीड येथे 'नारी शक्ती कौशल्य अभियान व जागरूकता सत्र' गुरुवार दि.१६ रोजी उत्साहात पार पडले. महिलांना त्यांचे घटनात्मक अधिकार आणि करिअरच्या संधींबाबत जागरूक करण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमासाठी प्रमुख मार्गदर्शक म्हणून प्रसिद्ध विधीज्ञ अ‍ॅड.आदर्श जाधव उपस्थित होते. तर, कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तुलसी शैक्षणिक समूहाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.प्रदीप रोडे हे होते. यावेळी प्राचार्या डॉ.अश्विनी बेद्रे, उपप्राचार्या सय्यद शहाना लियाकत अली, आयक्यूएसी समन्वयक डॉ. सुलेखा डोले, विभागप्रमुख सौ. विद्या आवघाडे व एचआर सौ. स्वरूपा कैवाडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रमुख मार्गदर्शक अ‍ॅड.आदर्श जाधव यांनी विद्यार्थिनींशी संवाद साधताना महिला सक्षमीकरणाच्या विविध कायदेशीर पैलूंवर सविस्तर मार्गदर्शन केले.

# महात्मा बसवेश्वर महाराजांच्या विचारांची आज समाजाला मोठी गरज : जयदत्त क्षीरसागर



बीड : महात्मा बसवेश्वर यांनी १२ व्या शतकात जातीभेद मोडून स्त्री-पुरुष समानतेचा संदेश दिला. त्यांच्या कार्याची दखल आजही जग घेत आहे. अशा महापुरुषांचे विचार समाजाला दिशा देणारे असून, आजच्या काळात त्यांच्या विचारांची नितांत गरज आहे, असे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. वीरशैव समाजाच्या वतीने आयोजित महात्मा बसवेश्वर महाराज जयंती उत्सवानिमित्त ते बोलत होते. यावेळी समाजातील विविध मान्यवर आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या सोहळ्याला डॉ योगेश क्षीरसागर,हर्षद दादा क्षीरसागर,भाजपचे शहराध्यक्ष अशोक लोढा, नगरसेवक शुभम धूत, बबनराव गोरे,राजेंद्र बनसोडे,निवासी जिल्हाधिकारी (विभागीय), शिवकुमार स्वामी,नगरसेवक राकेश जाधव,राणा चव्हाण यांच्यासह वीरशैव समाजातील अनेक प्रतिष्ठित व्यक्ती उपस्थित होत्या.

यावेळी बोलताना माजीमंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की बसवेश्वरांनी १२ व्या शतकात अनुभव मंटपाच्या माध्यमातून लोकशाही आणि समतेची पायाभरणी केली.सामाजिक एकता निर्माण करून समाजात पसरलेली अंधश्रद्धा,विषमता आणि जातीच्या भिंती तोडून सर्वांनी एक समाज म्हणून एकत्र येणे आणि विकास साधणे हीच त्यांना खरी श्रद्धांजली ठरेल. स्त्रियांना मानाचे स्थान मिळावे, हे बसवेश्वरांच्या कार्याचे प्रमुख सूत्र होते. आजही महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांच्या विचारांची अंमलबजावणी होणे आवश्यक आहे.असे ते म्हणाले

या जयंती निमित्त आयोजित या सोहळ्यात वीरशैव लिंगायत समाजातील बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. अतिशय उत्साही आणि भक्तिमय वातावरणात हा जयंती उत्सव संपन्न झाला.

या कार्यक्रमास शिवाप्पा भुरे,अशोक शहागडकर अशोक आप्पाची पाटील अनिल मिटकरी बाळू शेठ मिटकरी उत्तरेश्वर आप्पा कानडे कुंभेश्वर विभुते संदीप शेटे राजेंद्र राजमाने बंडू शेटे पंकज पायगुडे दादा स्वामी अनंत शहागडकर दिलीप ढेपे सचिन परंडकर चंद्रकांत कानडे अमर ढेपे अमोल होनराव गणेश स्वामी अमर शेटे सतीश आप्पा नगरे सचिन आप्पा शहागडकर उत्तरेश्वर स्वामी काळेगावकर गुरुलिंग आप्पा बेदरकर आंधळकर आप्पा,महेश शेटे सिद्धेश्वर शहागडकर,संजय घाळे,विलास आप्पा रवींद्र स्वामी,बेदरकर सचिन,रेगुडे पशुपती मिटकरी व समाज बांधव उपस्थित होते.

## भगवान श्री परशुराम जन्मोत्सव निमित्त पेशवा प्रतिष्ठान तर्फे रक्तदान शिबिर संपन्न



**अंबाजोगाई** | भगवान श्री परशुराम जन्मोत्सवानिमित्त पेशवा प्रतिष्ठान अंबाजोगाई यांच्या वतीने आयोजित रक्तदान शिबिराचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या शिबिराचे उद्घाटन मकरंद सोनेसांगवीकर, डॉ. सुधीर धर्मपात्रे, अ‍ॅड. विश्वजित जोशी, विशाल जहागिरदार, संजय देशपांडे व अनिता औटी यांच्या उपस्थितीत करण्यात आले. या वेळी पेशवा प्रतिष्ठानचे पदाधिकारी, स्वयंसेवक तसेच रक्तदाते मोठ्या संख्येने उपस्थित होते. शिबिरात एकूण ३२ जणांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जपली.

या रक्तदान शिबिरात डॉ महेश अकोलकर, डॉ संकेत तोरंबेकर,पार्थ कुलकर्णी,सचिन भातलवंडे,प्रमोद नांदगावकर,विशाल जहागिरदार,स्वप्नील कुलकर्णी,डॉ प्रिया मुळे,स्वप्ना देशपांडे,किशोर जोशी,राहुल कुलकर्णी,सारंग इवरकर,राघव कुलकर्णी,कविता किरण कुलकर्णी,किरण कुलकर्णी ,वल्लभ पिंगळे,वामन खोत,वामन मुळी,वेदांत जोशी,अनघा अविनाश लहुरीकर,आश्लेषा कळंबकर,पार्थ देशपांडे, डॉ मयुर सोनवळकर,शेखर देशपांडे,आनंद जोशी, संभाजी केंद्रे,पवन गिरवलकर आदींनी पुढाकार घेतला.

## बोबडेवाडीच्या शंकर करपे महाराजावर केज अंनिस ची कार्यवाही



केज/प्रतिनिधी

केज तालुक्यातील बोबडेवाडी येथील शंकर करपे महाराज गेली कांही वर्षांपासून लोकांना वेगवेगळया आजारावर इलाज करतो, लहान मुले व महिलावर उपचार करून त्यांच्या समस्या सोडवतो असे सांगून सामान्य लोकांना गंडविण्याचे काम करत होता. यापूर्वी चार महिन्यापूर्वी अंधश्रद्धा निर्मूलन समितीने बीड जिल्ह्यातील अशा तक्रार प्राप्त भोंदू लोकांची नावासह यादी जाहीर करून कार्यवाहीचा इशारा दिला होता. त्यानंतर बऱ्याच ठिकाणच्या अशा भोंदू महाराज बाबांनी लोकांना फसवण्याचे धंदे बंद केले होते. मात्र जिल्ह्यातील कांही ठिकाणची भोंदूगिरी बंद झालेली नव्हती. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीला जिल्ह्यातून अशा भोंदू महाराजांची माहिती व तक्रारी भेटल्या आहेत. त्यानुसार 17 एप्रिल रोजी सकाळी 11 वाजता महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे बीड जिल्हा अध्यक्ष हनुमंत भोसले, केज शाखेचे कार्याध्यक्ष गौतम बचूटे आणि बुवाबाजी संघर्ष समितीचे सचिव हनुमंत सौदागर यांनी बोबडेवाडी येथील शंकर करपे महाराज याच्याकडे भेट देऊन जाब विचारला असता संबंधित भोंदू महाराजाने आपणांस कांहीही येत नसल्याची कबुली दिली तसेच यापुढे आपण अशी भोंदूगिरी कधीही करणार नाही अशी कबुली ही दिली आहे. आपणांस कसलीही रिद्धी सिद्धी नसून लोकच स्वतः होऊन येऊन भाग पाडत होते. मात्र यापुढे भविष्यात आपण कोणतीही अशी कृती करणार नाही अशी कबुली दिली. समितीचे सदस्य भोंदू महाराजाच्या अर्धा तास समवेत असताना अमावस्याचे अवचित्य साधून अनेक लोक आपल्या समस्या घेवून या महाराजाकडे आलेले दिसले.

## जन शिक्षण संस्थानच्या विश्वकर्मा प्रशिक्षणार्थ्यांना आता 'AI' चे धडे



कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय ,भारत सरकार अंतर्गत कार्यरत असलेल्या जन शिक्षण संस्थान, बीड च्या वतीने जिल्ह्यात कौशल्य प्रशिक्षणातून स्वावलंबनाचे मोठे काम सुरू आहे. पारंपरिक व्यवसायाला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देण्यासाठी, पी. एम. विश्वकर्मा योजनेच्या प्रशिक्षणार्थ्यांना जिल्हा खादी व ग्रामोद्योग मंडळ, बीड च्या वतीने 'आर्टिफिशियल इंटेलिजन्स' (AI) विषयाचे विशेष प्रशिक्षण देण्यात आले.

**आधुनिक मार्केटिंगसाठी तंत्रज्ञानाची गरज** | गेल्या दोन वर्षांत पी. एम. विश्वकर्मा योजनेअंतर्गत जिल्ह्यातील सुमारे ११०० कारागिरांना विविध ट्रेडमध्ये प्रशिक्षण देण्यात आले आहे. मात्र, बदलत्या काळानुसार आपल्या उत्पादनांची मार्केटिंग आणि ब्रँडिंग करण्यासाठी तंत्रज्ञानाचा वापर अनिवार्य झाला आहे. हेच ओळखून, एआय च्या माध्यमातून साहित्याची मांडणी, उत्पादनांची गुणवत्ता वाढवणे आणि मार्केटिंग सुलभ करणे यावर या सत्रात भर देण्यात आला. प्रत्यक्ष प्रात्यक्षिकातून मार्गदर्शन यावेळी तज्ज्ञ मार्गदर्शक श्री. डोंगरे सर आणि श्री. गालफाडे सर यांनी प्रशिक्षणार्थ्यांना एआय ॲप्स कसे वापरावे, यातून नवनवीन माहिती कशी मिळवावी आणि आपल्या व्यवसायाची जाहिरात कशी करावी, याचे सविस्तर प्रात्यक्षिक दाखवले.

## प्रजा निरोगी, तर राज्य सशक्त: धारूरमध्ये 'आरोग्य संपन्न गाव' अभियानाचा एल्गार!
### गट विकास अधिकारी लोखंडे यांच्या उपस्थितीत कार्यशाळा; 70 टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या ग्रामपंचायतींना मिळणार 'आरोग्य संपन्न'चा किताब



किल्ले धारूर (प्रतिनिधी )

राज्यातील नागरिकांचे आरोग्यमान उंचावण्यासाठी आणि ग्रामीण भागाला सुदृढ बनवण्यासाठी शासनाने कंबर कसली असून, याअंतर्गत 'माझे गाव, आरोग्य संपन्न गाव' कार्यशाळा आज पंचायत समिती धारूर येथे उत्साहात पार पडली. आरोग्य विभाग आणि पंचायत समितीच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला गट विकास अधिकारी मा. लोखंडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

आरोग्य ही वैयक्तिक नव्हे, तर सामाजिक बाब!

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना वैद्यकीय अधीक्षक डॉ. बाळासाहेब सोळंके यांनी या अभियानाची प्रस्तावना मांडली. आरोग्य ही केवळ वैयक्तिक बाब नसून ती सार्वजनिक आणि पर्यावरणीय घटकांशी जोडलेली आहे, असे त्यांनी अधोरेखित केले. तर तालुका आरोग्य अधिकारी डॉ. शहाजी लोमटे यांनी अभियानाची सविस्तर रूपरेषा सांगताना, ग्रामीण भागात प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर देऊन संसर्गजन्य व असंसर्गजन्य आजार मुळापासून संपवण्याचा मानस व्यक्त केला. माता व बाल मृत्यूदर कमी करणे आणि आरोग्य हा विषय लोकचळवळ बनवणे. १ एप्रिल २०२६ पासून सुरू झालेल्या या अभियानात ग्रामपंचायत, महिला बचत गट आणि युवक मंडळांचा सक्रिय सहभाग असणार आहे. क्षयरोग, कुष्ठरोग यासह मधुमेह, उच्च रक्तदाब आणि कर्करोग यांसारख्या असंसर्गजन्य आजारांवर नियंत्रण मिळवणे.

या अभियानात उत्तम कामगिरी करणाऱ्या ग्रामपंचायतींसाठी राज्यस्तरावर ५ कोटी (प्रथम), ३ कोटी (द्वितीय) आणि २ कोटी (तृतीय)** रुपयांची भरघोस बक्षिसे जाहीर करण्यात आली आहेत. विशेष म्हणजे, या रकमेचा विनियोग केवळ स्वच्छता, शुद्ध पाणी आणि आरोग्य सुविधांसाठीच करता येणार आहे. ७० टक्क्यांहून अधिक गुण मिळवणाऱ्या गावांना 'आरोग्य संपन्न गाव' म्हणून गौरविण्यात येईल.

या कार्यशाळेला तालुका स्तरावरील सर्व अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, समुदाय आरोग्य अधिकारी आणि कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. "आपले गाव आरोग्य संपन्न बनवण्यासाठी सर्व घटकांनी एकत्र येऊन सामूहिक बदल घडवून आणावा," असे आवाहन यावेळी करण्यात आले.

## सव्वादोन लाखांचा मुद्देमाल जप्त; प्रतिबंधित सुगंधी तंबाखूपासून बनवला जात होता मावा



**गेवराई** | जिल्ह्यात सुरू असलेल्या अवैध गुटखा विक्रीविरोधी मोहिमेला मोठे यश मिळाले आहे. या मोहिमेअंतर्गत एका बेकायदा मावा कारखान्यावर कारवाई करत पोलिसांनी मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित सामग्री जप्त केली आहे. शहरात एका रहिवासी घराच्या परिसरात सुरू असलेल्या या अवैध धंद्याचा पर्दाफाश करण्यात आला असून, यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. वरिष्ठांनी दिलेल्या आदेशाचे पालन करत पोलिसांनी राबवलेल्या या विशेष मोहिमेमुळे अवैध व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

मिळालेल्या खात्रीशीर गोपनीय माहितीवरून पोलिसांनी शहरातील एका संशयिताच्या घराची तपासणी केली. संशयिताने आपल्या घरासमोरील पत्र्याच्या शेडमधील खोलीत प्रतिबंधित सुगंधी तंबाखू आणि इतर घातक घटकांचे मिश्रण करून मावा तयार करण्याचा कारखाना थाटला होता. मानवी आरोग्यास अपायकारक ठरणारे हे पदार्थ तयार करून त्याची सर्रास विक्री केली जात होती. छापा टाकल्यानंतर तिथे मोठ्या प्रमाणावर साठा करून ठेवलेला सुगंधी तंबाखू, सुपारी, मावा तयार करण्यासाठी वापरले जाणारे लोखंडी मोठे यंत्र, मिक्सर आणि इतर साहित्याचा साठा आढळून आला. अन्न आणि औषध प्रशासन विभागाच्या अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत हा सर्व मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला आहे. जप्त केलेल्या साहित्याची एकूण किंमत दोन लाख बारा हजार सातशे रुपये इतकी आहे.

या कारवाईत संबंधित आरोपीला पोलिसांनी ताब्यात घेतले असून त्याच्यावर अन्न सुरक्षा आणि मानके कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रतिबंधात्मक आदेश झुगारून नागरिकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या या व्यक्तीवर कठोर कारवाई करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या धडक कारवाईत पोलीस अधीक्षक, अप्पर पोलीस अधीक्षक, उपविभागीय पोलीस अधिकारी, पोलीस निरीक्षक आणि त्यांच्या विशेष पथकाचा समावेश होता. तसेच अन्न सुरक्षा विभागाच्या पथकानेही या कारवाईत सक्रिय सहभाग घेतला. या गंभीर प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक स्तरावरील अधिकारी करत आहेत. सार्वजनिक आरोग्यास धोका निर्माण करणाऱ्या अशा अवैध कारखान्यांविरुद्धची ही कारवाई पोलीस प्रशासनाची धडाकेबाज कामगिरी म्हणून पाहिली जात आहे.

# वडीलोपार्जित ७/१२ असलेल्या लाभार्थ्यांना 'पीएम आवास'साठी बांधकाम परवानगी मिळणार?
### सुधीर शिनगारे यांची मुख्याधिकाऱ्यांकडे मागणी; १० फेब्रुवारीच्या शासन निर्णयाचा आधार घेत जाचक अटी शिथिल करण्याचे साकडे

किल्ले धारूर: (प्रतिनिधी ) शहरातील ज्या नागरिकांकडे स्वतःची वडीलोपार्जित मालमत्ता आहे आणि ज्यांचे नाव ७/१२ उताऱ्यावर वारसा हक्काने लागलेले आहे, अशा लाभार्थ्यांना 'प्रधानमंत्री आवास योजने'चा लाभ मिळवताना येणारे तांत्रिक अडथळे दूर करावेत, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुधीर वसंतराव शिनगारे यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद किल्ले धारूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महाराष्ट्र शासनाच्या १० फेब्रुवारी २०२६ रोजीच्या नवीन महसूल व वन विभागाच्या तरतुदींचा वापर करून या लाभार्थ्यांना बांधकाम परवानगी द्यावी, जेणेकरून गरिबांच्या हक्काच्या घराचे स्वप्न साकार होईल, असा महत्त्वपूर्ण मुद्दा या निवेदनात मांडण्यात आला आहे.

काय आहे नेमकी अडचण?

किल्ले धारूर शहरात अनेक अर्जदारांनी प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत ऑनलाइन अर्ज करून मंजुरी मिळवली आहे. मात्र, प्रत्यक्ष बांधकाम परवानगी घेताना मालमत्ता कर आकारणी रजिस्टरमध्ये नाव असणे आणि 'गुंठेवारी' असणे अनिवार्य केले जाते. अनेक मालमत्ता या वडीलोपार्जित असून त्यांच्याकडे नोंदणीकृत दस्त (Sale Deed) नसल्याने गुंठेवारी अधिनियमातील अटींची पूर्तता करण्यात अडचणी येत आहेत. तसेच, २०२० पूर्वीचे खरेदीखत नसल्याने भूमी अभिलेख कार्यालयाकडून मोजणी नकाशे मिळण्यासही तांत्रिक बाधा येत आहे. परिणामी, पात्र असूनही अनेक नागरिक घराच्या



हक्कापासून वंचित राहत आहेत.

नवीन शासन निर्णयाचा आधार (GR १०/०२/२०२६) सुधीर शिनगारे यांनी आपल्या पत्रात महाराष्ट्र शासनाच्या महसूल व वन विभागाने १० फेब्रुवारी २०२६ रोजी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाचा (GR) दाखला दिला आहे. या निर्णयानुसार, अकृषिक (NA) परवानगी आणि सनद प्रक्रियेत सुलभता आणण्यासाठी महाराष्ट्र

> "राज्यातील सामान्य नागरिकांना स्वतःच्या हक्काचे घर मिळावे हे शासनाचे उदात्त हेतू आहे. तांत्रिक कारणांमुळे आणि कागदपत्रांच्या गुंतागुंतीमुळे गोरगरीब लाभार्थ्यांचे नुकसान होऊ नये. महसूल विभागाच्या नवीन नियमावलीचा आधार घेऊन नगर परिषद प्रशासनाने तातडीने सकारात्मक पावले उचलली, तर शेकडो नागरिकांच्या स्वप्नातील घरकुल प्रत्यक्षात उतरू शकेल."
> — सुधीर वसंतराव शिनगारे (अर्जदार)

जमीन महसूल संहिता सुधारणा अधिनियम २०२५ मधील तरतुदी लागू करण्यात आल्या आहेत.

निवेदनातील मुख्य मागण्या:

शासन निर्णयातील अनुक्रमांक ५ मधील तरतुदीनुसार, भूखंडधारकाकडून एकरकमी रूपांतरण अधिमूल्य (Conversion Premium) भरून घ्यावे.

मालमत्ता कर आकारणी रजिस्टरला नाव नोंदवून घेऊन ७/१२ व फेरफार नोंदीच्या आधारे त्वरित बांधकाम परवानगी देण्यात यावी.

गुंठेवारी आणि जुन्या खरेदीखताची जाचक अट शिथिल करून 'सर्वांसाठी घरे' या धोरणाची प्रभावी अंमलबजावणी करावी.

या मागणीमुळे आता नगर परिषद प्रशासन काय भूमिका घेते आणि नवीन शासन निर्णयाची अंमलबजावणी करून सर्वसामान्य धारूरकरांना दिलासा मिळतो का, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# माजलगाव मठातील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद



माजलगाव : येथील श्री संस्थान मठात श्री सद्गुरू मिस्कीन स्वामी यांच्या संजीवन समाधी उत्सवानिमित्त आयोजित करण्यात आलेले भव्य रक्तदान शिबिर उत्साहात झाले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त व भरघोस प्रतिसाद लाभला.

शुक्रवार, दि. १७ एप्रिल २०२६ रोजी (चैत्र अमावस्या) सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत आयोजित करण्यात आलेल्या या शिबिरात मोठ्या संख्येने युवक, नागरिक व भाविकांनी सहभाग नोंदवून रक्तदान केले. समाजोपयोगी या उपक्रमातून अनेक रूग्णांना जीवनदान मिळण्यास मदत होणार आहे. लिंगैक्य श्री गुरू तपोरत्नं प्रभुपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांच्या कृपाशिर्वादाने श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांच्या दिव्य सानिध्यात हा उपक्रम यशस्वीरित्या पार पडला. या शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थान मठाचे स्वयंसेवक व सर्व सहकार्य करणाऱ्यांचा श्रीगुरूंच्या शुभहस्ते सन्मान करण्यात आला. तसेच भविष्यातही अशा समाजोपयोगी उपक्रमांमध्ये भाविकभक्तांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयोजकांकडून करण्यात आले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# हिंगोली, औंढा नागनाथ येथे भगवान परशुराम जयंतीनिमित्त भव्य मिरवणुक




**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

श्री भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्ताने सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने रविवारी हिंगोली आणि औंढा नागनाथ येथे भव्य शोभायात्रेचे आयोजन करण्यात आले होते. या शोभायात्रेत मोठ्या संख्येने समाजबांधव सहभागी झाले होते.

दरवर्षी सकल ब्राह्मण समाजाच्या वतीने श्री भगवान परशुराम जन्मोत्सव निमित्ताने अनेक धार्मिक कार्यक्रम घेण्यात येतात. तसेच शहरातील प्रमुख मार्गावरून भव्य शोभायात्राही काढली जाते. त्या निमित्ताने यावर्षीही आज १९ एप्रिल रोजी हिंगोली शहरातील मंगळवारा दत्त मंदिर भागातून दुपारी ४ वाजता भव्य शोभायात्रा प्रारंभ झाला. यावेळी श्री भगवान परशुराम यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. ही शोभायात्रा माहेश्वरी भवन, मसानपेठ, मारवाडी गल्ली, कपडा गल्ली, महात्मा गांधी चौक, इंदिरा गांधी चौक, नांदेड नाका ते एनटीसी भागातील परशुराम उद्यानात विसर्जित करण्यात आली. या शोभायात्रेत भगवान परशुरामासह अनेक सजीव देखावे सादर केले होते. बँन्ड, ढोलताशाच्या गजरात लेझिम व टाळ मृदंगाचा निनाद करीत ही शोभायात्रा परशुराम उद्यानात विसर्जित करण्यात आली. या ठिकाणी शोभायात्रा आल्यानंतर रात्री ७ वाजता महाआरती, महाआरती नंतर रात्री १० वाजेपर्यंत उपस्थित भाविकांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. आजच्या भगवान परशुराम जयंतीनिमित्त काढण्यात आलेल्या शोभायात्रेत सकल ब्राह्मण समाज उत्सव समितीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनं परिश्रम घेतले.

औंढा नागनाथ येथेही श्री भगवान परशुराम जयंती आणि महात्मा बसवेश्वर जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी भगवान श्री परशुराम व महात्मा बसवेश्वर महाराज यांच्या प्रतिमेस नगराध्यक्ष कपिल खंदारे व उपनगराध्यक्ष मनोज देशमुख यांनी पुष्पहार अर्पण करून पूजन केले. यावेळी नगराध्यक्ष कपिल खंदारे, उपनगराध्यक्ष मनोज देशमुख, नगरसेवक राहुल दंतवार ,प्रदीप कनकुटे, अनिल देव, विजय महामुने, पत्रकार दत्तात्रय शेगुकर, गजानन नाईक, विलास काचगुंडे, सतीश रणखांबे, मनोहर रणखांबे, नलिनी मलमवार, नंदा अभोरे, मंजुषा जाधव यांच्यासह नगरसेवक, नगरसेविका व नगरपंचायत कर्मचारी उपस्थित होते.

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे संबोधन पाहण्यासाठी भाजप पदाधिकाऱ्यांची उपस्थिती



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी रात्री साडेआठ वाजता नारी शक्ती वंदन विधेयकाबद्दल देशातील जनतेला संबोधित केले. याचे थेट प्रक्षेपण पाहण्यासाठी येथील राजयोग मेडीकलवर भारतीय जनता पक्षाच्या लोकप्रतिनिधीसह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

देशातील अर्धी लोकसंख्या असलेल्या महिलांना त्यांचे हक्क मिळावा यासाठी केंद्र सरकारने संसदेत नारी शक्ती विधेयक आणले होते परंतु काँग्रेस, समाजवादी पार्टी, डीएमके आणि तृणमुल काँग्रेससह त्यांच्या मित्र पक्षांनी विधेयकाविरोधात मतदान करीत हे विधेयक नामंजूर केले. याबद्दल जनतेशी संवाद साधण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी रात्री साडेआठ वाजता टीव्हीवरून देशातील महिलांना संबोधित केले. यावेळी त्यांनी काँग्रेस आणि त्यांच्या मित्र पक्षांनी देशातील नारी शक्तीचा अपमान केला असून त्याना त्यांच्या हक्कापासून वंचीत ठेवण्याचे काम केले आहे. परिसीमन हा टेक्नीकल मुद्दा समोर करून या विधेयकाला विरोध केला. वास्तविक काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षाला महिलांना अधिकार द्यावयाचे नाहीत. यापूर्वीही अनेकवेळा काँग्रेस पक्षाने महिला विधेयकाला विरोध केला आहे. लोकसभा आणि विधानसभेत महिलांना ३३ टक्के वाटा देणाऱ्या या विधेयकाला काँग्रेस आणि इतर पक्षांनी विरोध केला आहे. येणाऱ्या काळात महिला काँग्रेस आणि त्यांच्या मित्रपक्षाला धडा शिकवल्याशिवाय राहणार नाही असे प्रतिपादन यावेळी पंतप्रधान मोदी यांनी केले. यावेळी आ. तान्हाजीराव मुटकुळे, जिल्हाध्यक्ष गजाननराव घुगे, के के शिंदे, मिलींद यंबल, जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे, जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, महिला आघाडीच्या सुनीता मुळे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहीत, क्रिष्णा रूहीटीया, नगरसेवक हमीद प्यारेवाले, कैलाश शहाणे, बाबा घुगे, संजय ढोके, लखन कुरील, कैलाश श्रीनाथ, महेश शहाणे, संजय खंडेलवाल, श्रीरंग राठोड, सदाशिव सूर्यतळ, नितीन राठौर, सचिन शिंदे आदीची उपस्थिती होती.

# हिंगोलीत महात्मा बसवेश्वर यांची जयंती उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**



शहरात कायकवे कैलास म्हणजेच काम हीच आपली पूजा हा संदेश देणारे समता नायक जगतज्योती महात्मा बसवेश्वर यांची ९२१ वी जयंती आमदार तान्हाजीराव मुटकुळे, शिवसेनेचे गटनेते श्रीराम बांगर, माजी नगराध्यक्ष व जिल्हा वीरशैव सभेचे अध्यक्ष सुधीरअप्पा सराफ यांच्या प्रमुख उपस्थितीत जगत ज्योती महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून साजरी करण्यात आली.

याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त करत असताना आमदार तान्हाजीराव मुटकुळे यांनी महात्मा बसवेश्वर यांच्या वचन स्तंभाचे सुशोभीकरण करून, महात्मा बसवेश्वराचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यासाठी योग्य ती मदत करण्याचे आश्वासन दिले. श्रीराम बांगर यांनीही महात्मा बसवेश्वरांचा पूर्ण कृती पुतळा बसवण्याच्या अनुषंगाने नगरपालिकेच्या वतीने प्रशासकीय स्तरावर लागणारी आवश्यक ती मदत आम्ही करून देऊ आश्वासित केले. त्यासोबतच याप्रसंगी नगरसेवक नाना नायक, विशाल गोटरे, कपिल खंडेलवार, रामरतन शिंदे उपस्थित होते. याप्रसंगी महिला प्रतिनिधी म्हणून सौ. सविताताई सराफ, सौ. ज्योती मदाम, सौ.मीराबाई टाले उपस्थित होत्या, तसेच ज्येष्ठ समाज बांधव शिवशंकर अप्पा सराफ, माळोदे आप्पा, प्राचार्य रामदास मुकटे, भीमाशंकर आप्पा सराफ, श्याम स्वामी, दरगु अप्पा, शिवानंद आप्पा होकर्णे उपस्थित होते.या जयंती महोत्सवाच्या यशस्वीतेसाठी पिंटू टाले, महेश जैनापुरे,नागेश सराफ, प्रा. बस्वराज लक्षटे, प्रा. महेश्वर मंगनाळे, चंदू उबाळे तसेच जिल्हा वीरशैव लिंगायत सभा, जिल्हा शिवा संघटना, जिल्हा बसव ब्रिगेड व सर्व लिंगायत बांधव यांनी एकत्रित येऊन एकजुटीने या जयंती उत्सवात सहभाग नोंदवला.



**हिंगोली– साडे तीन मुहुर्तापैकी एक असणाऱ्या अक्षय तृतीयेनिमित्त शहरातील बाजारपेठेत आज आंबे खरेदी करण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती तसेच अक्षय तृतीयेनिमित्त मातीच्या कळसा, बिनगीची खरेदी करण्यासाठीही नागरिकांनी मोठी गर्दी केली होती. छाया– सुनील पाठक**

## संक्षिप्त वृत्त

### रमादेवी श्रीनाथ भट्ट यांचे निधन



हिंगोली– शहरातील भट्ट कॉलनी येथील रहिवासी सौ. रमादेवी श्रीनाथ भट्ट यांचे वयाच्या ८४ व्या वर्षी रविवारी, १९ एप्रिल रोजी पहाटे ३:४० वाजता अल्पशा आजाराने निधन झाले. भारतीय विद्या मंदिर विद्यालयातील क्रीडा शिक्षक दिवंगत श्रीनाथ यांच्या पत्नी सौ.रमादेवी भट्ट यांचे पार्थिवावर शहरातील कयाधू नदीच्या काठावर असलेल्या मोक्षधाम येथे रविवारी दुपारी ४ वाजता अंत्यसंस्कार करण्यात आले. दिवंगत रमादेवी भट्ट यांच्या दुःखद निधनानंतर चार मुलगे प्रेमनाथ, जितेंद्र, आनंद, पप्पू, दोन मुली आणि जावई, सून, नात, नातू आणि पणतू असा परिवार आहे.

### भाजप जनसंपर्क कार्यालयात जयंती साजरी



हिंगोली– भारतीय जनता पक्षाच्या जनसंपर्क कार्यालयात भगवान परशुराम आणि थोर समाजसुधारक, क्रांतीयोगी महात्मा बसवेश्वर महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. यावेळी आमदार तान्हाजीराव मुटकूळे यांनी दोन्ही महापुरुषांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन केले. यावेळी माजी जिल्हाध्यक्ष फुलाजीराव शिंदे,माजी नगराध्यक्ष बाबाराव बांगर,जिल्हा सरचिटणीस उमेश नागरे, शिवा घुगे,जिल्हा प्रवक्ता विलास गोरे, शहराध्यक्ष रजनीश पुरोहित, नगरसेवक हमीद प्यारेवाले, रामरतन शिंदे,नगरसेवक कैलाश शहाणे, मनोज शर्मा, श्रीरंग राठोड, माजी नगरसेवक सदाशिव सुर्यतळ, दिपक शेठ्ठी, बाळासाहेब नाईक, गुड्डू देवकते, हरी लेकूळे, आशिष जैस्वाल, राहुल शिंदे, गोविंद करहाळे, मंहमद रमजान प्यारेवाले यांच्यासह भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

### आदर्शमध्ये महात्मा बसवेश्वर जयंती साजरी

हिंगोली–येथील आदर्श महाविद्यालयात महात्मा बसवेश्वर यांची जयंती साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव हे होते. याप्रसंगी प्राचार्य प्रो. डॉ. विलास आघाव यांच्या शुभहस्ते व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन प्रा. डॉ. सचिन हाटकर यांनी केले.

# डॉ. आंबेडकर जयंतीनिमित्त मुलींच्या भव्य कबड्डी सामन्यांचे उद्घाटन

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**



भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त हिंगोली जिल्हा हौशी सायकलिंग असोसिएशन व बहुजन क्रिडा शिक्षक संघटनेच्यावतीने मुलींचे भव्य कबड्डी सामन्यांचे उद्घाटन शिवसेना आ. संतोष बांगर यांचेहस्ते करण्यात आले.

येथील संत नामदेव पोलिस कवायत मैदानावर रविवारी या सामन्यांचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण, युवा जिल्हा प्रमुख राम कदम, शिवाजी इंगोले प्राध्यापक बंकटलाल यादव, दत्तराव बांगर, गजानन आडे यांच्यासह इतर शिक्षक उपस्थित होते. कबड्डीच्या स्पर्धेसाठी जिल्ह्यातील विविध मुलींच्या संघानी सहभाग घेतला आहे. प्रथम बक्षीस माजी नगराध्यक्ष दिलीप चव्हाण यांचेतर्फे ११९३५ तर द्वितीय बक्षीस जगजीत खुराणा यांचेतर्फे ७१३५, तृतीय बक्षीस अनिल नेनवाणी यांचेतर्फे ५१३५ रूपये देण्यात येणार आहेत. याशिवाय इतरही बक्षीसे प्रदान करण्यात येणार आहेत. या कबड्डी स्पर्धेसाठी शिवाजी इंगोले, रामदास हनुमंते, गजानन आडे यांनी परिश्रम घेतले.

# अत्याचाराच्या खोट्या गुन्ह्यात गोवेन म्हणणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

अत्याचाराच्या खोट्या गुन्ह्यात गोवण्याची धमकी देत पैशाची मागणी करणाऱ्या नांदेड जिल्ह्यातील एका महिलेवर हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार हिंगोली येथील बळसोंड भागातील आशिष वाजपेयी हे युवा विकास सोसायटी अंतर्गत शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या प्रमोद महाजन कौशल्य विकास योजनेमध्ये काम करतात. बेरोजगार तरूणांना रोजगारक्षम बनविण्यासाठी त्यांनी नांदेड जिल्ह्यात काम सुरू केले होते. यामध्ये त्यांनी नांदेड जिल्ह्यातील एका महिलेची समन्वयक म्हणून नियुक्ती केली होती. या नियुक्तीनंतर मागील दोन वर्षापासून त्यांच्यात जवळीक निर्माण झाली. त्यानंतर ते लिव्ह इनमध्ये आले. या जवळीकतेचा गैरफायदा घेत त्या महिलेने आशिष यांचेकडे सतत पैशाची मागणी सुरू केली. त्यानंतर त्यांनी महिलेस वीस लाख रूपये व पाच तोळे सोने दिले. त्यानंतरही पुन्हा पैशाची मागणी केली जात असल्याने त्यांनी एका वेळी एक लाख, तीन लाख व सहा लाख रूपयांच्या रकमेचे धनादेश त्या महिलेला दिले.

दरम्यान, त्या महिलेकडून वारंवार पैशाची मागणी केली जात होती. काही दिवसांपूर्वीच तिने पैशाची मागणी केली. पैशासाठी ती महिला दि १५ एप्रिल रोजी बळसोड येथील घरी देखील आली होती. त्या महिलेकडून वारंवार होणाऱ्या पैशाच्या मागणीला कंटाळून आशिष यांनी पैसे देण्यास नकार दिला. यामुळे महिलेने समाजात बदनामी करेल तसेच अत्याचाराचा गुन्हा दाखल करून जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकारामुळे आशिष यांनी हिंगोली ग्रामीण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली. यावरून पोलिसांनी त्या महिलेविरूध्द गुन्हा अदखल पात्र गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास पोलिस निरीक्षक शामकुमार डोंगरे, जमादार बाळासाहेब खोडवे हे करीत आहेत.

# वसमत रेल्वे स्टेशन परिसरात नागरिक, पत्रकाराकडून पोलिस चौकीची मागणी

**तभा वृत्तसेवा**
**वसमत, १९ एप्रिल**




वसमत शहरातील रेल्वे स्टेशन परिसरात वाढत्या गुन्हेगारी प्रवृत्तीमुळे स्थानिक नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, या ठिकाणी कायमस्वरूपी पोलिस चौकी स्थापन करण्याची मागणी जोर धरत आहे.

वसमत रेल्वे स्टेशन हे शहराबाहेर असल्यामुळे रात्रीच्या वेळेस, विशेषतः रात्री नऊनंतर, या परिसरात लुटमारीसारख्या घटना घडत असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. काही गुन्हेगारी प्रवृत्तीच्या व्यक्तींमुळे नागरिक व रेल्वे प्रवासी असुरक्षित वाटत असल्याचे चित्र आहे. परिणामी, अपरात्री रेल्वेने येणाऱ्या प्रवाशांना गावात जाण्यास धाडस होत नाही. सध्या पोलिस गस्त पथकाकडून नियमित गस्त घालण्यात येत असली तरीही गस्तीची गाडी एका ठिकाणी जास्त वेळ थांबू शकत नसल्याने या समस्येवर प्रभावी तोडगा निघत नाही, अशी नागरिकांची तक्रार आहे.

दरम्यान, या परिसरात महादेव मंदिर, ईदगाह, चिमनशाहा वली यांची दर्गा, शीख बांधवांचे ऐतिहासिक गुरुद्वारा दमदमा साहेब, तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आणि बौद्ध विहार असल्यामुळे येथे नागरिक व भाविकांची सतत वर्दळ असते. विविध धार्मिक स्थळांच्या उपस्थितीमुळे हा परिसर सामाजिक दृष्ट्या महत्त्वाचा मानला जातो.

या पार्श्वभूमीवर, नागरिकांनी रेल्वे स्टेशन चौकात कायम स्वरूपी पोलिस चौकी स्थापन करून गुन्हेगारीवर आळा घालावा, तसेच भाविक व प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री करावी, अशी मागणी केली आहे. पोलिस अधीक्षकांनी याकडे लक्ष देऊन तातडीने कार्यवाही करावी, अशी नम्र विनंतीही स्थानिकांनी केली आहे. नागरिकांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ही मागणी अत्यंत महत्त्वाची असून, प्रशासनाने यावर सकारात्मक निर्णय घेण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

# कळमनुरी– बाळापूर मार्गावर दोन ट्रकची धडक

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, १९ एप्रिल**

कळमनुरी ते आखाडा बाळापूर मार्गावर कामठा फाटा शिवारामध्ये दोन ट्रकची समोरासमोर धडक झाली. या अपघातात एक जण ठार तर तिघेजपण गंभीर जखमी झाले आहेत. जखमींना नांदेड येथे उपचारासाठी हलविण्यात आले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार कळमनुरी ते आखाडा बाळापूर मार्गावर डोंगरगाव पूलाजवळ पुलाच्या दुरूस्तीचे काम सुरू आहे. त्यामुळे या महामार्गावर एकाच बाजूने वाहतुक सुरू आहे. रविवारी पहाटे हिंगोलीहून ट्रक क्र आरजे ०९ जीसी ०९६७ नांदेडकडे जात होता. हा ट्रक कामठा फाटा शिवारात आला असतांना नांदेडकडून येणाऱ्या ट्रकची समोरासमोर धडक झाली. सदर अपघातामध्ये चालक आसीम सलीम घाची रा अरवली गुजरात जागीच ठार झाले. तर तुफान गवारवाल राठोड, बाबुलला मकवाना, हफीज मुलतानी हे गंभीर जखमी झाले. या अपघाताची माहीती मिळताच महामार्ग पथकाचे सपोनि साईनाथ अनमोड, जमादार सोपान थिटे, गजानन कोरडे, प्रवीण राठोड यांनी धाव घेतली. पोलिसांनी जखमींना तातडीने आखाडा बाळापूर येथील ग्रामीण रूग्णालायात उपचारासाठी दाखल केले प्राथमिक उपचारानंतर त्यांची प्रकृती गंभीर असल्यामुळे नांदेड येथील रूग्णालयात हलविण्यात आले आहे. अपघात एवढा भीषण होता की दोन्ही ट्रकच्या केबीनचा चुराडा झाला होता.

# पत्रकार परिषदेच्या अधिवेशनात उदगीर जिल्हा मागणीचा जोर; पालकमंत्री सकारात्मक

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १९ एप्रिल : जिल्हा व्हावा ही उदगीरकरांची तसेच आमदार संजय बनसोडे यांची मागणी असून, त्या दृष्टीने सरकार सकारात्मक असल्याचे संकेत लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी केले उदगीर जिल्हा व्हावा ही उदगीरकरांची तसेच आमदार संजय बनसोडे यांची मागणी असून, त्या दृष्टीने सरकार सकारात्मक असल्याचे संकेत लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांनी दिले. उदगीर येथे आयोजित अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्या ४४ व्या अधिवेशनाच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते.

पालकमंत्री म्हणाले की, उदगीर जिल्हा व्हावा यासाठीची जबाबदारी माझ्यावर टाकली आहे. मात्र आमदार संजय बनसोडे हे थेट मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचू शकतात. त्यांनी पुढाकार घेतल्यास आम्हीही त्यांच्यासोबत जाण्यास तयार आहोत. त्यांच्या ताकदीमुळे उदगीरकरांची जिल्हा निर्मितीची अपेक्षा निश्चित पूर्ण होईल. त्यांनी पुढे सांगितले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार हे उदगीर जिल्हा निर्मितीबाबत सकारात्मक आहेत. आवश्यक सर्व मूलभूत सुविधा तयार करण्यात आल्या असून, सरकार या विषयावर गंभीरपणे पाठपुरावा करत आहे.

उदगीर येथील स्वामी विवेकानंद शैक्षणिक संकुलात या अधिवेशनाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पत्रकार परिषदेचे विश्वस्त एस. एम. देशमुख होते, तर उद्घाटक म्हणून राजेंद्र दर्डा उपस्थित होते. यावेळी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील, माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, जिल्हाधिकारी भारत बाष्टेवाड,



पोलिस अधीक्षक अमोल तांबे, नगराध्यक्षा स्वाती हुडे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहुल केंद्रे, तहसीलदार राम बोरगावकर, विवेकानंद संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य सुधीर जगताप यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे उद्घाटन राजेंद्र दर्डा, शिवेंद्रसिंह राजे भोसले, बाबासाहेब पाटील आणि एस. एम. देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पालकमंत्री भोसले यांनी पत्रकारांच्या प्रश्नांवर भाष्य करताना सांगितले की, सरकार पत्रकारांच्या मागण्यांबाबत सकारात्मक असून, त्या पूर्ण करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू. पत्रकारिता ही केवळ व्यवसाय नसून तपश्चर्या आहे. आचार्य बाळशास्त्री जांभेकर यांनी पत्रकारितेची पायाभरणी केली, तर लोकमान्य टिळकांनी तिला बळ दिले. पत्रकारांचे लेखन सत्ताधाऱ्यांना आत्मपरीक्षण करायला भाग पाडते. त्यांनी लातूर सिव्हिल हॉस्पिटलच्या कामातही पत्रकारांच्या आंदोलनाचा मोठा वाटा असल्याचे नमूद केले.

या कार्यक्रमात माजी मंत्री आमदार संजय बनसोडे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील आणि एस. एम. देशमुख यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. अधिवेशनाच्या निमित्ताने सकाळी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी विविध वेशभूषेसह प्रभात फेरी काढून सर्वांचे लक्ष वेधले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी सचिन शिवशेट्टे, युवराज धोतरे, बिभीषण मद्देवाड, सिद्धार्थ सूर्यवंशी, अर्जुन जाधव यांच्यासह स्थानिक पत्रकारांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिता यलमटे, श्रीपाद सिमंतकर व रसूल पठाण यांनी केले, तर प्रस्ताविक सचिन शिवशेट्टे यांनी मांडले आणि आभार बिभीषण मद्देवाड यांनी मानले.

या अधिवेशनात उदगीर जिल्हा कृती समितीने पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्यासह उपस्थित मान्यवरांना निवेदन देत उदगीर जिल्हा निर्मितीची मागणी केली. यावेळी मोठ्या संख्येने उदगीरकर उपस्थित होते.

माजी मंत्री आमदार संजय बनसोडे यांनीही या मुद्द्यावर जोर देत पालकमंत्र्यांनी जिल्हा निर्मितीसाठी सक्रिय प्रयत्न करावेत, अशी मागणी केली. यावर प्रतिसाद देताना पालकमंत्री भोसले म्हणाले, सरकार सकारात्मक आहे. जिल्हा झाला तरी मी मंत्री असताना मीच पालकमंत्री असेन. तेव्हा मला विसरू नका, मी दोन्ही जिल्ह्यांचा पालकमंत्री असेन. त्यांच्या या वक्तव्यावर उपस्थितांमध्ये हशा पिकला.

एकूणच, या पत्रकार अधिवेशनात उदगीर जिल्हा निर्मितीचा मुद्दा केंद्रस्थानी राहिला असून, सरकार सकारात्मक असल्याचे संकेत मिळाल्याने उदगीरकरांच्या आशा पुन्हा पल्लवित झाल्या आहेत.

अनेकांनी शब्द दिला पण पाळला नाही - एस. एम. देशमुख कार्यक्रमात बोलताना एस. एम. देशमुख यांनी अनुपस्थित राहिलेल्या निमंत्रितांवर नाराजी व्यक्त केली. अनेकांनी उपस्थित राहण्याचे आश्वासन दिले, मात्र ते पाळले नाही, असे स्पष्ट शब्दांत त्यांनी सांगितले. कार्यक्रमासाठी अनेकांना निमंत्रण देण्यात आले होते, मात्र काही मान्यवर अनुपस्थित राहिल्याने त्यांनी खंत व्यक्त केली.

## संक्षिप्त...

## समाधान शिबीर' उत्साहात

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १९ एप्रिल :** लातूर : छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियानांतर्गत आयोजित 'समाधान शिबीर' (टप्पा क्र. १) कासारखेडा येथील महमदापूर पाटी मंगल कार्यालयात उत्साहात व यशस्वीपणे पार पडले. 'शासन आपल्या दारी' या संकल्पनेला साकार रूप देत विविध शासकीय सेवा नागरिकांपर्यंत थेट पोहोचविण्यात आल्या.

या शिबिरात महसूल विभागासह इतर शासकीय विभागांच्या योजना व सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या. उत्पन्न, रहिवासी व जात प्रमाणपत्रे, रेशन कार्ड दुरुस्ती, नाव समाविष्ट वगळणे, मतदार यादी सुधारणा, शेतरस्ते व पांदन रस्त्यांचे प्रश्न, आरोग्य सेवा, आधार दुरुस्ती तसेच श्रावण बाळ व संजय गांधी निराधार योजनेची माहिती देण्यात आली. कार्यक्रमाला आमदार रमेशआप्पा कराड, तहसीलदार सौदागर तांदळे, गटविकास अधिकारी शाम गोडभरले, जिल्हा परिषद सदस्य महादेव साळुंखे, पं. स. पांडुरंग बालवाड, परमेश्र्वर कांबळे, प्रताप पाटील, आदिनाथ मुळे, विक्रम शिंदे, यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक तहसीलदार सौदागर तांदळे यांनी केले. शिबिरात १५ हून अधिक स्टॉल उभारण्यात आले होते. एकूण १४६९ लाभार्थ्यांना विविध प्रमाणपत्रांचे वाटप आ. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते करण्यात आले.

शिबिराच्या यशस्वीतेसाठी मंडळ अधिकारी महेश हिप्परगे, तलाठी स्वप्निल बेंबडे, योगेश मिश्रा, शितल वंगवाडे, अनुराधा पन्हाळे, मीना गुंडरे, शुभांगी कुलकर्णी, सहाय्यक महसूल अधिकारी शिवनंदा राठोड, संपत माने, रवी वावरे, सुनील चनवाड, कोतवाल प्रियंका तेलंगे, ज्ञानेश्र्वर काळे, मस्के, जयेश जगताप आदींचे सहकार्य लाभले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नायब तहसीलदार गणेश सरोदे यांनी केले.

## उदगीरमध्ये गुटखा पकडला

तभा वृत्तसेवा

उदगीर दि. १९ एप्रिल : साडे चौदा हजारांचा गुटखा पकडला उदगीर : येथील बसस्थानकात गुरुवारी (दि. १६) सायंकाळी ६ वाजताच्या सुमारास एका व्यक्तीकडे १४ हजार पाचशे रुपयांचा प्रतिबंधित गुटखा पोलिसांनी पकडला आहे. याप्रकरणी उदगीर शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला आहे.

याबाबत फिर्यादी पोलीस अंमलदार संजीव परशुराम मुंढे यांनी पोलिसात दाखल केलेल्या तक्रारीनुसार, आरोपी विठ्ठल माधवराव शिंदे (रा. जांब ता. मुखेड) याने महाराष्ट्र राज्यात विक्रीसाठी प्रतिबंधित असलेला सुगंधीत पान मसाला व तंबाखूजन्य गुटखा जवळ बाळगलेला पोलिसांना मिळून आला. पोलिसांनी त्याच्या ताब्यातून केसरयुक्त विमल पान मसाला, व्ही. १ तंबाखू, सागर पान मसाला, एस. आर. सुगंधित तंबाखू, रजनीगंधा सुगंधित पान मसाला, बाबा १२० सुगंधी तंबाखू असा एकूण १४ हजार पाचशे रुपयांचा प्रतिबंधित गुटखा जप्त करण्यात आला आहे. तर आरोपीविरुद्ध शहर पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

## हातपंप दुरूस्त करण्याची मागणी

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट दि. १९ एप्रिल :** सध्या जळकोट तालुक्यात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. यासोबतच पाणीटंचाईची तीव्रताही वाढलेली आहे. जळकोट तालुक्यातील माळहिपरगा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या शिवाजीनगर तांडा येथील हातपंप नादुरुस्त झाला आहे. यामुळे या तांड्यावर प्रचंड पाणीटंचाई निर्माण झाली आहे. उन्हाळ्यात या तांड्यावरील नागरिकांना पाण्यासाठी वण - वण भटकंती करावी लागत आहे. बंद हातपंपाची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी अशी मागणी वाढीस लागली आहे.

शिवाजीनगर तांड्यावर दोन हात पंप आहेत. यातील एका हातपंपाचे पाणी पूर्णपणे कमी झाले आहे तर एक हातपंप आहे तो मागच्या काही दिवसांपासून नादुरुस्त झाला आहे. या हातपंपाचा वरच्या बाजूकडील जिथून पाणी येते तो भाग खराब झाला आहे. येथील लोकप्रतिनिधींनी पंचायत समितीकडे हातपंप दुरुस्तीची मागणीही केली. मात्र पंचायत समितीकडे ना साहित्य आहे ना मनुष्यबळ त्यामुळे येथील नागरिकांना अशा पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

जळकोट येथील हातपंप दुरुस्त करणाऱ्या वाहनावर तीन लोक कार्यरत होते. त्यापैकी दोघे आता कामावर नसल्याने एकाच कर्मचाऱ्यावर ही जबाबदारी येऊन पडली आहे. आता उन्हाळ्याचे दिवस असल्याने याच गावातील नाही तर तालुक्यातील कोणत्याही गावचा हातपंप खराब होण्याची, बंद पडण्याची शक्यता नाकारता येत नाही. ही गरज लक्षात घेऊन वारंवार जळकोट पंचायत समितीकडे मनुष्यबळ देण्याची मागणी केली असतानाही लातूर जिल्हा परिषदेचे याकडे दुर्लक्ष होत आहे. याचा परिणामी जळकोट तालुक्यात नागरिकांना पाणीटंचाईस सामोरे जावे लागत आहे.

## केन्द्रीय विद्यालय बीएसएफ सीबीएसई १० वी चा निकाल शंभर टक्के

### ९० टक्के पेक्षा जास्त ८ ८० टक्के पेक्षा जास्त २४ विद्यार्थी

**तभा वृत्तसेवा**

**चाकूर दि. १९ एप्रिल :** पीएम श्री.केन्द्रीय विद्यालय, बॉर्डर सिक्युरिटी फोर्स चाकूर दहाविचा निकाल शंभर टक्के लागला असून,आपल्या उत्कृष्ट शैक्षणिक कामगिरीने पुन्हा एकदा एक नवीन आदर्श निर्माण केला आहे. शाळेने २०२६ च्या इयत्ता १० वी सीबीएसई बोर्ड परीक्षेत शंभर टक्के निकाल मिळवून एक अभिमानास्पद टप्पा गाठला आहे. हे यश विद्यालय मजबूत शैक्षणिक प्रणाली, शिस्तबद्ध वातावरण आणि समर्पित शिक्षकांच्या अविरत मार्गदर्शनाचा परिणाम आहे. विद्यालय प्राचार्य, श्री. हरीश कटारिया यांच्या सक्षम नेतृत्वाखाली विद्यार्थ्यांनी अपवादात्मक कामगिरी करून शाळेला गौरव मिळवून दिला आहे.







यावर्षी एकूण ६० विद्यार्थी परीक्षेला बसले होते आणि सर्वजण ६० ही उत्तीर्ण झाले. यापैकी ०८ विद्यार्थ्यांनी ९०% पेक्षा जास्त गुण आणि २४ विद्यार्थ्यांनी ८०% पेक्षा जास्त गुण मिळवले आहेत, जे शाळेच्या दर्जेदार शिक्षणाचा पुरावा आहे. गुणवंत विद्यार्थी (टॉपर्स): पहिला क्रमांक हुडगे आरुषी संजय (९७.४%) हिने, दुसरा क्रमांक कोटलापुरे प्रणव संजीव (९६.४%) याने आणि तिसरा क्रमांक तनिष्का माणिक पवार (९५.४%) याने पटकावला.याशिवाय, पलमाटे उत्कर्ष भागवत (९२.८%), अनिशा (९२.२%), रुंझुन रामप्रसाद गित्ते (९१%), कुंवर सलोनी रविशिंग (९०.२%) आणि नातू श्रद्धा (९०%) यांनीही उल्लेखनीय यश मिळवले.विद्यालयाच्या या उत्कृष्ट निकालावर प्राचार्य हरीश कटारिया, मुख्याध्यापक गोविंद सूर्यवंशी यांच्यासह सर्व शिक्षक- कवितेश भारद्वाज, पन्नालाल इंगोले, प्रतिभा तोमर, सोनू शर्मा, सौरभ वर्मा, सुचिता चंदनशिवे, सतीश फुलारी, जयसिंग राठोड, संतोष नर्ले, प्रभाकर साहू , राकेश महावर, मोहितकुमार, प्रदीप यादव,शैलजा सिंग, ऋतिक माली , श्र्वेता पाटील, गौतम अवसरमोल, कुशालसिंग हजारी, मच्छिंद्र बडे, देशमुख हणमंत, गजानन माने, रियाझ शेख, राजेंद्र अंधारे, अशोक बडे, सचिन गित्ते, कुलकुले खुदबोदीन , राजश्री इंगळे, मोहन गित्ते,शेख नईम यांनी या यशाबद्दल विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आणि विद्यार्थ्यांच्या पालकांनी आनंद व्यक्त केले असून त्यांना उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## खत विक्रीत अनियमितता केल्याने

### २३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने तात्पुरते रद्द

जळकोट : सध्या जळकोट तालुक्यात उन्हाची तीव्रता प्रचंड वाढली आहे. यासोबतच पाणीटंचाईची तीव्रताही वाढलेली आहे. जळकोट तालुक्यातील माळहिपरगा ग्रामपंचायत अंतर्गत येणाऱ्या शिवाजीनगर तांडा येथील हातपंप नादुरुस्त झाला आहे. यामुळे या तांड्यावर प्रचंड पाणीटंचाई निर्माण झाली आहे. उन्हाळ्यात या तांड्यावरील नागरिकांना पाण्यासाठी वण - वण भटकंती करावी लागत आहे. बंद हातपंपाची दुरुस्ती तात्काळ करण्यात यावी अशी मागणी वाढीस लागली आहे. शिवाजीनगर तांड्यावर दोन हात पंप आहेत. यातील एका हातपंपाचे पाणी पूर्णपणे कमी झाले आहे तर एक हातपंप आहे तो मागच्या काही दिवसांपासून नादुरुस्त झाला आहे. या हातपंपाचा वरच्या बाजूकडील जिथून पाणी येते तो भाग खराब झाला आहे. येथील लोकप्रतिनिधींनी पंचायत समितीकडे हातपंप दुरुस्तीची मागणीही केली. मात्र पंचायत समितीकडे ना साहित्य आहे ना मनुष्यबळ . त्यामुळे येथील नागरिकांना अशा पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

खरीप हंगाम तोंडावर असतानाच गुण नियंत्रण विभाग ॲक्टिव झाला आहे. १ मार्च ते ९ एप्रिल या कालावधीत युरिया व डीएपी खत विक्रीत अनियमितता केल्याने २३ कृषी सेवा केंद्रांचे परवाने रद्द करण्यात आले आहेत. या मोहिमेत १०९ दुकानांची तपासणी करण्यात आली होती.

कृषी विभागाच्या मोहिमेदरम्यान, ई-पॉसद्वारे २० व २० बॅगपेक्षा जास्त युरिया व डीएपी खताची विक्रेत्यांनी शेतकऱ्यांना विक्री केली. ज्या दुकानांची तपासणी कृषी अधिकाऱ्यांनी केली त्याअनुषंगाने शुक्रवारी (दि. १७) येथील जिल्हा कृषी अधीक्षक अधिकारी कार्यालयात जिल्हा कृषी अधीक्षक राजेंद्र कदम यांच्या उपस्थित सुनावणी पार पडली. परवानाधारक रासायनिक खतसाठा रजिस्टर एन फॉर्म न ठेवणे, असलेला साठा आणि रजिस्टरमधील साठा यामध्ये तफावत,

# गरीबांच्या फ्रिजची मागणी वाढली

**तभा वृत्तसेवा** ( शंकर मिटकर )

**शिरूर अनंतपाळ** दि. १९ एप्रिल : तालुक्यात सध्या उन्हाची तीव्रता लक्षात घेता थंडगार व आरोग्यदायी पाण्यासाठी मातीच्या माठांना पसंती बरोबरच कुंभार समाजालाही रोजगार मिळाला आहे.



उन्हाची तीव्रता वाढताच अनेकांचे पाय गरीबाचे फ्रिज म्हणून ओळखले जाणाऱ्या माठाकडे वळत असल्याचे सध्या बाजारपेठेत चित्र दिसून येत आहे. मार्च महिना सुरू झाल्यापासून पिण्याच्या पाण्यासाठी वापरले जाणारे माठ ठीक- ठिकाणी बाजारात विक्रीस आलेले दिसत आहेत. माठाचे पाणी आरोग्यास लाभदायक असून यापासून अनेक फायदे होतात. यामुळे अनेक जण माठ खरेदी करीत असताना दिसून येत आहेत. होळीच्या नंतर उन्हाची दाहकता एकदम तीव्र होते. त्यामुळे या माठाचे महत्व आजही अबाधित आहे. दरवर्षी उन्हाळ्यात तालुक्याच्या ठिकाणी सर्वसामान्यांची तहान भागवण्यासाठी तसेच वरदळीच्या ठिकाणी सार्वजनिक पानपोई म्हणून भला मोठा रांजण किंवा माठाचा उपयोग होतो. या माठाचा उपयोग हॉटेल तसेच विविध ठिकाणी थंड पाण्याचा वापर होत आहे.

**उन्हाळ्यात प्रत्येकाला आपली तहान भागवण्यासाठी थंड पाण्याचे आवश्यकता भासत असते. त्यामुळे सर्वसामान्य माणूस चविष्ट आणि थंड पाण्यासाठी मातीचाच माठ वापरत असतो. जुन्या काळातील माठ हा सध्या गरीबाचा फ्रीज म्हणून ओळखला जातो. त्यामुळे मातीच्या माठात पाणी थंड करून घेतलेले शरीरासाठी हितकारक असल्यामुळे ग्रामीण भागात आजही माठाला मोठी मागणी आहे.**

सध्या शिरूर अनंतपाळ तालुक्यात उन्हाच्या झळा चांगल्याच जानवु लागल्या आहेत. फेब्रुवारी च्या शेवटच्या आठवड्यात उन्हाच्या झळा सौम्य स्वरूपाच्या होत्या मात्र होळीच्या नंतर दिवसेंदिवस उन्हाचा दाह वाढत आहे. त्यामुळे पुढचे दीड ते दोन महिने उन्हाची तीव्रता वाढण्याची शक्यता नाकारता येत नाही असे तर्क वितर्क नागरिकांतून वर्तवले जात आहेत. उन्हाच्या तीव्रतेमुळे आपली तृष्णा थंड करण्यासाठी अनेक जण थंड पेयाच्या दुकानाकडे आकर्षित होतात. फ्रिजचे पाणी अनेक जणांना अपायकारक असल्यामुळे प्रत्येक जण माठ खरेदी करताना दिसून येतो. यामुळे कुंभार समाजाला व्यवसाय मिळतो. माठाची दरवर्षी उन्हाळ्यात मागणी वाढते.त्यामुळे भाव मिळतो. श्रीमंत वर्गात सुद्धा या माठाला आकर्षण आहे. माठातील पाणी थंडगार आणि मधुर लागते. यामुळे माठाला गरिबाचे फ्रिज असे संबोधले जाते.

## जगतज्योती महात्मा बसवेश्वर जयंती विशेष



**चाकूर :** शिवकुमार ऊस्तुर्गे,हेमलता गुणाले,अब्दुलकरीम शेख, रोहिदास मद्रेवार, प्रकाश तेलंग, रमेश वाघमारे, महेश जानकर, पद्माकरराव जोशी, कर्मचारी शेषराव साळी सह विविध मान्यवर उपस्थित होते.



महालक्ष्मी मंदिर लातूर- मठ्ठा,शरबताचे वाटप करण्यात आले.

## तांबाळा पाटीवर अडीच लाखांचा गुटखा जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १९ एप्रिल :** बंदी असलेल्या गुटख्याची कारमधून वाहतूक करीत पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकाने टाकलेल्या धाडीत सुगंधित तंबाखू, पानमसाला, व गुटख्याचा २ लाख ५९ हजार रुपयांचा साठा पकडला आहे. पोलिसांनी कारसह एकूण साडेआठ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. निलंगा तालुक्यातील तांबाळा पाटीवर शनिवारी (दि.१८) सकाळी पावणे दहा वाजेच्या सुमारास ही कारवाई केली.



शनिवारी, पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकास मिळालेल्या माहितीच्या आधारे निलंगा तालुक्यातील तांबाळा पाटी येथे सापळा रचण्यात आला. यात पांढऱ्या रंगाची मारुती सुझुकी कंपनीची वॅगनर कार (एम एच २४ सी डी ३५९३) थांबवून तपासणी करण्यात आली. वाहनात गुटखा व सुगंधित पानमसाल्याचा साठा आढळून आला. वाहन चालक संजय काशिनाथ कन्ना (रा. उस्तुरी, ता. निलंगा) यास ताब्यात घेऊन पंचांसमक्ष जप्ती पंचनामा करण्यात आली. विविध प्रकारच्या सुगंधित तंबाखू, पानमसाला असा २ लाख ५९ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल आढळून आला. त्याच्या वाहतुकीसाठी वापरण्यात आलेली ६ लाख रुपये किमतीची मारुती सुझुकी वॅगनर कार जप्त करण्यात आली. एकूण मुद्देमाल अंदाजे ८ लाख ५९ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. या प्रकरणी अन्न सुरक्षा अधिकारी विठ्ठल सटवाजी लोंढे यांनी फिर्याद दिली. त्यावरून आरोपीविरुद्ध अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ चे कलम ५९ तसेच भान्यासंअंतर्गत कलम १२३, २७४, २७५, २०(३) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस अधीक्षकांच्या विशेष पथकातील प्रशिक्षणार्थी उपविभागीय पोलीस अधिकारी अक्षय जाधव, उपनिरीक्षक आयूब शेख, उत्तम जाधव, रामहरी भोसले, यशवंत घुगे, कासार शिरसी पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक गर्जे, अंमलदार तपसे, नागमोडे यांनी बजावली.

## कल्याण वाघमारे यांना श्रद्धांजली

**तभा वृत्तसेवा**

**लातूर दि. १९ एप्रिल :** लातूर : लातूरच्या नाट्यविश्र्वाला मोठा धक्का देणारे नाट्यवेडे रंगकर्मी कल्याण वाघमारे यांना लातूरच्या रंगकर्मींकडून दि. १८ एप्रिल रोजी सकाळी ११ वाजता येथील हॉटेल पंचवटीमध्ये झालेल्या सभेत श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

यावेळी प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, सुषमा अंधारे, माजी महापौर विक्रांत गोजमगुंडे, एम. आर. पाटील, डॉ. अशोक आरदवाड, प्रदीप पाटील खंडापूरकर, संजय आयाचित, सु-रेखा मदने, प्रा. सुधीर देशमुख, अनिल कांबळे, पांडुरंग वाघमारे, अजय पांडे, भास्कर माने, अतुल देऊळगावकर, संजय जमदाडे, प्रा. सुधीर अनवले, मोहन माने, अरुणा वाघमारे आदी उपस्थित होते.

